**सुविचार**

यदि हम शान्ति का समर्थन करना चाहते हैं तो हमें इसके लिए चीखने- चिल्लाने की क्या आवश्यकता है ?

विश्वसनीय बातम्यांचे एकमेश वृत्तपत्र

दैनिक

# यशवंत

✦लातूर/धाराशीव/बीड/नांदेड ✦/रविवार दि. १ सप्टेंबर २०२४✦वर्ष ५२ वे✦अंक-१९० ✦पृष्ठे८✦किंमत १ रुपया ✦RNINO.39924/83 ✦OMD-426/2020-22✦

## पंतप्रधानांनी ३ रेल्वे गाड्यांना दाखवला हिरवा झेंडा

नवी दिल्ली : पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज, शनिवारी ३ वंदे भारत रेल्वे गाड्यांना हिरवा झेंडा दाखवला. 'मेक इन इंडिया' आणि आत्मनिर्भर भारत या पंतप्रधानांच्या दृष्टिकोनाची जाणीव करून देत अत्याधुनिक वंदे भारत एक्सप्रेस, मेरठ-लखनौ, मदुराई-बेंगळुरू आणि चेन्नई-नागरकोइल या ३ मार्गांवर संपर्क सुविधा सुधारेल. तसेच या रेल्वे गाड्यांमुळे उत्तर प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटकमध्ये संपर्क सुविधा वाढणार आहे.

दृकश्राव्य माध्यमातून आभासी पद्धतीने या गाड्यांचा शुभारंभ केल्यानंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी म्हणाले की, मदुराई-बेंगळुरू, चेन्नई-नागरकोइल आणि मेरठ-लखनौ या ३ वंदे भारत रेल्वे गाड्यांमुळे उत्तर ते दक्षिण भारताच्या विकासाच्या प्रवासात एक नवीन



अध्याय लिहिला जात आहे, देशातील वंदे भारत गाड्यांचे आधुनिकीकरण आणि विस्तार करून देश विकसित भारताच्या ध्येयाकडे वाटचाल करत आहे.

या गाड्यांमुळे देशातील महत्त्वाच्या शहरांमध्ये तसेच ऐतिहासिक शहरांमध्ये संपर्क सुविधा स्थापित झाली आहे. मंदिरांचे शहर मदुराई आता आयटी सिटी बेंगळुरूशी जोडले गेले आहे, असे पंतप्रधान म्हणाले.

या गाड्या केवळ सुलभ संपर्क सुविधा उपलब्ध करुन देणार नाहीत तर, विशेषत: शनिवार आणि रविवार किंवा सणाच्या कालावधीतही यात्रेकरूंसाठी देखील खूप फायदेशीर ठरतील, असेही ते म्हणाले.

चेन्नई-नागरकोइल मार्गामुळे विद्यार्थी, शेतकरी आणि आयटी व्यावसायिकांना मोठा फायदा होईल. वंदे भारत गाड्यांशी जोडल्या गेलेल्या पर्यटनस्थळी पर्यटनात झालेल्या वाढीची नोंद पंतप्रधानांनी घेतली. या प्रदेशातील व्यवसाय आणि रोजगाराच्या संधींतही वाढ झाल्याचे दिसून येत असल्याचे पंतप्रधान म्हणाले. तीन नवीन वंदे भारत रेल्वे गाड्यांद्दल पंतप्रधानांनी नागरिकांना शुभेच्छा दिल्या.

वंदे भारत म्हणजे भारतीय रेल्वेच्या आधुनिकीकरणाचे नवे प्रतिक असल्याचे पंतप्रधान मोदी यांनी अधोरेखित केले. प्रत्येक शहरात आणि प्रत्येक मार्गावर वंदे भारताची मागणी होत असल्याचे सांगत, अतिवेगवान रेल्वेगाड्यांच्या (पान ६ वर)

## आरक्षणास तयार असल्याचे महाविकास आघाडीकडून लेखी घेऊन दाखवा

मुंबई : जरांगे पाटलांचे म्हणणे काय आहे की, मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षण द्या. एका मिनिटासाठी आपण असे समजू की देवेंद्र फडणवीस अयोग्य व्यक्ती आहे. माझे त्यांना आव्हान आहे की, लोकसभेमध्ये




ज्यांना त्यांच्यामुळे मदत मिळाली ते महाविकास आघाडीचे शरद पवार, उद्धव ठाकरे आणि नाना पटोले यांच्याकडून त्यांनी आम्ही मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण देण्यास तयार आहोत, असे लेखी घ्यावे, असे चॅलेंज देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगेंना दिले.

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीचे वारे वाहण्यास सुरुवात झाली आहे. मराठा आरक्षण आंदोलन मनोज जरांगेंनीही निवडणुकीत उमेदवार उतरवण्याची घोषणा केली आहे. त्यामुळे राजकीय पारा दिवसेंदिवस चढू लागला आहे. अशात अंतरवाली सराटी झालेल्या बैठकीत मनोज जरांगे यांनी फडणवीसांचे आमदार पाडू, असे विधान केले. त्या विधानाला उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी उत्तर दिले.

एका वृत्तवाहिनीला दिलेल्या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी मनोज जरांगे यांना प्रतिआव्हान दिले आहे. मनोज जरांगेंच्या विधानावर फडणवीस म्हणाले, देवेंद्र फडणवीसांचे आमदार पाडू. सरकार कोणाचे आहे; एकनाथ शिंदे, देवेंद्र फडणवीस, अजित पवार. सरकारचे प्रमुख कोण आहेत, एकनाथ शिंदे. सरकारमध्ये अधिकार कोणाला असतात, मुख्यमंत्र्यांना असतात. म्हणून मी परवा सांगितले की, मराठा समाजाच्या संदर्भात मुख्यमंत्र्यांना एखादा निर्णय घ्यायचा आहे. आणि तो निर्णय माझ्यामुळे अडलाय, असे जर मुख्यमंत्र्यांनी (पान ६ वर)

## हरियाणामध्ये मतदानाची तर जम्मू काश्मीरमध्येही मतमोजणीची तारीख बदलली

नवी दिल्ली : निवडणूक आयोगाने हरियाणा निवडणुकीच्या तारखांमध्ये बदल केले आहेत. आयोगाने हरियाणातील मतदानाची जाहीर केलेली तारीख १ ऑक्टोबर बदलून ५ ऑक्टोबर केली आहे.



याचबरोबर जम्मू काश्मीर आणि हरियाणा विधानसभा निवडणुकांच्या मतमोजणीची तारीख ४ ऑक्टोबरवरुन ८ ऑक्टोबर करण्यात आलेली आहे. जम्मू काश्मीरमध्ये मतदानाच्या तारखेत कोणतेही बदल केलेले नाहीत.

भाजपसह अनेक राजकीय पक्षांनी हरियाणातील निवडणुकांच्या तारखांमध्ये बदल करण्याची मागणी निवडणूक आयोगाकडे केली होती.

त्यानंतरच आयोगाने तारखेत बदल केले आहेत. निवडणूक आयोगाने याबाबत माहिती देताना सांगितले की, बिश्नोई समाजाच्या मतदानाचा अधिकार आणि परंपरा या दोहोंचा सन्मान ठेवण्यासाठी हा निर्णय घेतला आहे.

## ५० वर्षात प्रथमच जमिनीवरील चक्रीवादळाचा समुद्रात धुमाकूळ

नवी दिल्ली : -नेहमी समुद्रातून चक्रीवादळ निर्माण होतात आणि जमीनवर येऊन बरसतात. परंतु गुजरामधील अरबी समुद्रात उलटा प्रवास होत आहे. गुजरातमध्ये कमी दाबाच्या पट्यामुळे मुसळधार पाऊस झाला. त्यानंतर आता समुद्रात परिणाम दिसत आहे. समुद्रात चक्रीवादळ निर्माण झाले असून त्याला 'आसना' हे नाव दिले आहे. 'आसना'मुळेच गेल्या काही दिवसांपासून गुजरातमध्ये अतीवृष्टी झाली.

भारतीय हवामान विभागाने कच्छमधील खाडीवरील जमिनीवर चक्रीवादळ निर्माण झाल्याची माहिती दिली. या चक्रीवादळास 'आसना' हे नाव पाकिस्तानने दिले आहे. गेल्या ५० वर्षांत चक्रीवादळ समुद्राच्या किनारी असलेल्या जमिनीवर तयार झाल्याचे हे पहिले उदाहरण आहे. गुजरात आणि पाकिस्तानमधील कच्छजवळील भागात आणि ईशान्य अरबी समुद्रावर तयार झालेल्या खोल दाबामुळे चक्रीवादळ तयार झाले आहे. हे ६ किमी/तास वेगाने पश्रि्चमेकडे अरबी समुद्रात सरकले आहे.

आयएमडीच्या माहितीनुसार, 'आसना' चक्रीवादळ १९४४, १९६४ आणि १९७६ मध्ये आले होते. यापूर्वी १९७६ मध्ये ओरिसामधील जमिनीवर चक्रीवादळ आहे. १९४४ मध्ये आलेल्या चक्रीवादळाने प्रचंड नुकसान केले होते. त्यानंतर १९६४ मध्ये चक्रीवादळ गुजरातच्या किना-यावर तयार झाले होते.

वाढत्या तापमानाचा परिणाम

पृथ्वी विज्ञान मंत्रालयाचे माजी सचिव माधवन राजीवन यांनीही एक्सवर ट्विट लिहीत आश्र्चर्य व्यक्त केले आहे. त्यांनी लिहिले आहे की, उत्तर अरबी समुद्रावर झालेला बदल पाहून आश्र्चर्य वाटते. या महिन्यात उत्तर अरबी समुद्र थंड असतो हे आपल्याला नेहमीच माहीत आहे. परंतु आता येथे चक्रीवादळ तयार झाले. म्हणजे हा भाग गरम आहे. जे ग्लोबल वॉर्मिंग आणि स्थानिक पातळीवर वाढत्या तापमानाचा परिणाम आहे.

## पुरी पिक्चर अभी बाकी है : मुख्यमंत्री

नागपूर : आम्ही सोन्याचा चमचा तोंडात घेऊन जन्माला आलेलो नाही. आम्ही शेतकऱ्यांच्या कुटुंबात जन्माला आलेलो आहोत. आम्हीही गरिबी पाहिली आहे. त्यामुळे या योजनेची गरज का आहे, हे आम्हाला कळते. १,५०० रुपयांचे मोल आम्हाला ठाऊक आहे. जशी जशी तुम्ही आम्हाला ताकद द्याल, महायुतीला पाठिंबा देत जाल, तसे तसे आम्ही तिघे भाऊ ओवाळणीची रक्कम वाढवत नेऊ. अभी तो ये सिर्फ ट्रेलर है, पुरी पिक्चर अभी बाकी है, आगे आगे देखो होता है क्या.. असे म्हणत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी विरोधकांवर घणाघात करत लाडक्या बहिणींशी संवाद साधला.

नागपूरच्या रेशिमबाग मैदानावर राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी लाडकी बहिण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे कार्यक्रम संपन्न झाला. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि महिला व (पान ६ वर)

## लाडकी बहीण योजना कुणी माईचा लाल बंद पाडू शकणार नाही : पवार

नागपूर : आम्ही वचन पाळणारी लोक आहोत आणि वचनपूर्ती करणारे हे सरकार आहे. आम्ही दिशाभूल करणारे सरकार नाही. आम्ही लाडकी बहीण योजनेच्या निमित्याने अडीच कोटी महिलांना या योजनेचे उद्दिष्ट डोळ्यासमोर ठेवलं आहे. आता या योजनेत जवळ जवळ १ कोटी ६० लाख बहिणी लाभार्थी झाल्या आहेत. अजून पुढचे टप्पेही लवकरच होणार आहे. ज्यांच्या अर्ज राहिल्या आहे, त्यांनी अजून ही अर्ज करावे. आम्ही तो लाभ त्यांना देऊ.



मात्र विरोधक या महत्वाकांशी योजनेचे टिंगल टवाळी करत होते. योजनेवर शंका व्यक्त करत होते. हे विरोधक एवढे वर्ष सत्तेत होते, तेव्हा तुम्हाला का नाही सुचले महिलांना मदत करण्याचे? तोंडात सोन्याचा चमचा घेऊन जन्माला आलेले काही विरोधक आमच्यावर टीका करत आहेत. मात्र तुम्ही फक्त महायुतील साथ द्या, लाडकी बहीण योजना कुणी माईचा लाल बंद पाडू शकणार नाही, असा विश्र्वास राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी बोलताना व्यक्त केला आहे.

राज्यात आम्ही २८८ जागांवर उभे राहू, त्यावेळी फक्त आशीर्वाद द्या- अजित पवार

लाडकी बहीण योजनेत नोव्हेंबर पर्यंतचे पैसे तुम्हाला मिळतीलच. मात्र नोव्हेंबर महिन्यात निवडणूक होईल. आम्ही तिघे कुठे धनुष्यबाण, कुठे कमळ, तर कुठे घड्याळ या चिन्हावर २८८ जागांवर उभे राहू. त्यावेळी तुम्ही महायुतीला भरभरून मतदान करा. मी शब्द देतो, ही योजना आम्ही पुढील पाच वर्ष सुरू ठेवू, तुम्ही फक्त आशीर्वाद द्या. असे आवाहनही अजित पवार यांनी बोलताना केलं आहे.

नागपूरसह विदर्भातून हजारोंच्या संख्येने महिलांची उपस्थिती

नागपूरच्या रेशिमबाग मैदानावर राज्य सरकारच्या महत्वाकांक्षी लाडकी बहिण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याचे कार्यक्रम संपन्न होत आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस,उपमुख्यमंत्री अजित पवार, (पान ६ वर)

## भारताला रुबिनाने मिळवून दिले नेमबाजीत चौथे पदक

पॅरिस : पॅरिसमध्ये पॅरालिम्पिक २०२४ स्पर्धेत भारतीय नेमबाज चमकले आहेत. शुक्रवारी भारताला नेमबाजीतून तीन पदके मिळाली. आता चौथे पदक भारताच्या रुबिना फ्रान्सिस हिने मिळवून दिले. तिने शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी महिला १० मीटर एअर पिस्तुल एसएच१ प्रकारात कांस्य पदक मिळवून दिले. अंतिम फेरीत रुबिनाने सुरुवात चांगली केली होती. त्यानंतर मधल्या वेळेत ती थोडी मागे पडली. परंतु, नंतर तिने पुनरागमन करत पुन्हा पहिल्या तीन जणींमध्ये स्थान मिळवले. तीन नंतर तिस-या क्रमांकावर राहिली आणि तिने कांस्य पदक निश्रि्चत केले. तिने २११.१ पॉइंट्स मिळवले. या प्रकारात इराणची सारा (पान ६ वर)

## आ.अमित देशमुख यांनी शिवकथा सोहळ्यास उपस्थित राहून केली महाआरती

लातूर /प्रतिनिधी :- राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री तथा लातुरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शनिवार दि. ३१ ऑगस्ट रोजी दुपारी लातूर शहरातील विशाल नगर येथील श्री काशी विश्वेश्वर मंदिर येथील संगीतमय शिवकथा व परम रहस्य पारायण सोहळ्यास उपस्थित राहून महाआरती केली.

श्री काशी विश्वेश्वर मंदीर येथे श्रावण मासानिमित्त दरवर्षीप्रमाणे शिवकथा व परमरहस्य पारायण सोहळा आयोजीत करण्यात आला आहे. माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या सोहळयास भेट दिली. शिवकथा ऐकली आणि श्री श्री श्री १००८ जगद्गुरु डॉ. मल्लिकार्जुन विश्वराध्य



शिवाचार्य महास्वामीजी ज्ञानपीठ काशी व शिवकथाकार अमृतेश्वर शिवाचार्य महाराज व डॉ. शांतवीरलींग शिवाचार्य महाराज यांचे आशीर्वाद घेतले. यावेळी लातूरचे खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी महापौर दिपक सूळ, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, ॲड. गंगाधरप्पा हामणे, बसवंतअप्पा भरडे, भालचंद्रप्पा मानकरी, बिराजदार, पंचाक्षरी, जितेंद्र स्वामी आदीसह कॉंग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महिलांच्या सन्मानासाठी सर्वजण संवेदनशील राहूया: जिल्हाधिकारी




लातूर, / प्रतिनिधी: महिलांची सुरक्षा ही आपली सामाजिक बांधिलकी आहे. आपल्या संस्कृतीत महिलांना नारीशक्ती म्हटले जाते. त्यामुळे या नारीशक्तीच्या सन्मानासाठी आपण सर्वजण संवेदनशील आणि सजग राहूया, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी शुक्रवारी येथे केले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जिल्हा नियोजन समिती सभागृहात शहरातील शाळा, महाविद्यालये, दवाखाने, उद्योग, वाहतूक संघटना यांच्या प्रतिनिधींशी संवाद साधताना त्या बोलत होत्या.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, प्रभारी अपर जिल्हाधिकारी संगीता टकले, जिल्हा पुरवठा अधिकारी प्रियांका आयरे, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. हणमंत वडगावे, पोलीस उपअधीक्षक श्री. भातलवंडे यावेळी उपस्थित होते.

आपला लातूर जिल्हा हा संवेदनशील आणि सामाजिक भान जपणारा जिल्हा आहे. आपली हीच ओळख कायम राहावी, यासाठी आपण सर्वजण एकत्रितपणे महिलांच्या सन्मानासाठी आणि सुरक्षितेसाठी पुढाकार घेवूया. आपल्या दवाखान्यात, कार्यालयात, उद्योग किंवा कोणत्याही आस्थापनेत काम करणाऱ्या महिला, तसेच शाळा व महाविद्यालयातील मुलींची काळजी घेण्यासाठी प्रत्येक आस्थापनेने आवश्यक उपाययोजना करणे बंधनकारक आहे. या सर्वांचे हक्क, अधिकार अबाधित राहतील, त्यांच्यासोबत कोणीही गैरकृत्य होणार नाही, यासाठी योग्य खबरदारी घेतली जावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी केल्या. तसेच असे गैरप्रकार होत असल्याचे निदर्शनास आल्यास कोणाचीही गय केली जाणार नाही, असे त्यांनी सांगितले.

प्रत्येक शाळा, महाविद्यालये आणि कार्यालयात महिलांसाठी स्वतंत्र तक्रार पेटी ठेवण्यात यावी. तसेच समाजातील महिलांचे महत्व, त्यांच्या संरक्षणासाठी असलेले विविध कायदे याबाबत माहिती देण्यासाठी येत्या गणेशोत्सवात महिलांच्या सन्मानाचा जागर करणारे देखावे सादर व्हावेत, असे (पान ६ वर)

## वानवडा, शिंदाळा आणि येल्लोरी ग्रामस्थांशी संवाद साधून आ. कराड यांनी जाणून घेतल्या अडीअडचणी

लातूर / प्रतिनिधी- लातूर ग्रामीण मतदार संघातील भादा सर्कल मधील मौजे वानवडा, शिंदाळा आणि येल्लोरी येथील ग्रामस्थांशी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी शुक्रवारी सकाळी संवाद साधला, महायुती शासनाच्या विविध कल्याणकारी योजनेबाबत चर्चा करून अडीअडचणी जाणून घेतल्या. आमदार साहेबांनी गावात येऊन जनतेचे प्रश्न समजून घेतले काही प्रश्न तिथेच निकाली काढण्याचा प्रयत्न केला यामुळे तिन्ही गावातील नागरिकाकडून समाधान व्यक्त केले जात आहे.

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील गावागावात वाडी वस्तीत जाऊन नागरिकांशी चर्चा करण्यासाठी संवाद अभियान सुरू केले आहे या अभियानांतर्गत शुक्रवारी सकाळी वानवाडा शिंदाळा आणि येल्लोरी या तीन गावांना भेटी



देऊन ग्रामस्थांशी संवाद साधला. वानवडा येथील ९२ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाची भूमिपूजन केले तर ६८ लाख रुपये खर्चाच्या झालेल्या विकास कामाचा लोकार्पण असे एकूण १ कोटी ६० लाख रुपये खर्चाच्या विकास कामाचा आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी त्यांच्या समवेत भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायतराज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, जिल्हा उपाध्यक्ष पद्माकर चिंचोलकर, रवी पाटील, महादेव मुळे, गुणवंत कारंडे, सतीश कात्रे, वाजिद पठाण यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती.

लातूर ग्रामीण मतदार संघातील प्रत्येक गावात कमीत कमी ५० लाख आणि जास्तीत जास्त ५ कोटी रुपये विविध विकास कामासाठी निधी मिळून दिला याचे मला समाधान आहे. गेल्या १५ वर्षात या भागातून निवडून गेलेल्या कॉंग्रेस आमदारांनी काय विकास केला, कुठल्या योजनेला निधी आणला (पान ६ वर)

# विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम अंतर्गत अंतिम मतदार यादी प्रसिध्द

लातूर, दि. ३० : आयोगाच्या आदेशानुसार १ जुलै २०२४ या अर्हता दिनांकावर आधारित छायाचित्र मतदार याद्यांचा सुधारीत दुसरा विशेष संक्षिप्त पुनरिक्षण कार्यक्रम घोषित केला होता. या पुनरिक्षण कार्यक्रमातंर्गत ३० आगस्ट, २०२४ रोजी लातूर जिल्ह्यातील सर्व २ हजार १४२ मतदान केंद्रावर अंतिम मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. तसेच लातूर जिल्ह्यातील तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय येथेही मतदार यादी प्रसिध्द करण्यात आली आहे.

या यादीनुसार लातूर जिल्ह्यात २० लाख १६ हजार ९९० मतदारांचा समावेश आहे. यामध्ये १० लाख ५५ हजार २५२ पुरुष मतदार आणि ९ लाख ६१ हजार ६७६ महिला मतदार आणि ६२ इतर मतदारांचा समावेश आहे.

२३४-लातूर ग्रामीण मतदारसघांत १ लाख ७४ हजार ९२ पुरुष मतदार, १ लाख ५६ हजार १०५ महिला मतदार आणि इतर ३ असे एकूण ३ लाख ३० हजार २०० मतदारांचा समावेश आहे.

२३५-लातूर शहर मतदारसघांत २ लाख ३ हजार ३७४ पुरुष मतदार, १ लाख ९० हजार ८८७ महिला मतदार आणि इतर २६ असे एकूण ३ लाख ९४ हजार २८७ मतदार, २३६-अहमदपूर मतदारसघांत १ लाख ८० हजार ५२९ पुरुष मतदार, १ लाख ६३ हजार ८७३ महिला मतदार आणि इतर १ असे एकूण ३ लाख ४४ हजार ४०३ मतदार, २३७-उदगीर मतदारसघांत १ लाख ८० हजार ५२९ पुरुष मतदार, १ लाख ६३ हजार ८७३ महिला मतदार आणि इतर १ असे एकूण ३ लाख ४४ हजार ४०३ मतदार समाविष्ट आहेत.

२३८-निलंगा मतदारसघांत १ लाख ७२ हजार ०६५ पुरुष मतदार, १ लाख ५६ हजार १ महिला मतदार आणि इतर ९ असे एकूण ३ लाख २८ हजार ०७५ मतदार आहेत, तसेच २३९-औसा मतदारसघांत १ लाख ५९ हजार ३८१ पुरुष मतदार, १ लाख ४१ हजार ७५० महिला मतदार आणि इतर ४ असे एकूण ३ लाख १ हजार ३५ मतदार आहेत.

छायाचित्र मतदार ओळखपत्र हे मतदारांची ओळख पटविण्यासाठी असून मतदारांचे नाव मतदार यांदीत असेल, तरच त्यांना मतदानाचा हक्क बजाविता येणार आहे. त्यासाठी आपल्याकडे मतदार ओळखपत्र असले, तरीही मतदार यादीत नाव असल्याची खातरजमा करुन घेणे आवश्यक आहे. जेणेकरुन मतदानाच्या दिवशी मतदानाचा हक्क गमावण्याची वेळ येणार नाही. नागरीकांनी आपले नाव मतदार यादीत तपासण्यासाठी https://ceo.maharashtra.gov.gov.in या संकेतस्थळाला भेट द्यावी किंवा मवोटर हेल्पलाईनफ पचा वापर करावा. तसेच प्रसिध्द करण्यात आलेली अंतिम मतदार यादी मतदान केंद्रस्तरीय अधिकारी (बीएलओ) यांच्याकडे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

लातूर जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रस्तरीय अधिकारी व मतदान मदत केंद्र येथे वोटर हेल्प सेंटर येथे मतदार यादीत नाव नोंदणीसाठी विहीत नमुन्यातील अर्ज स्वीकारले जातील. तसेच मतदार म्हणून नोंदणी करण्यासाठी किंवा आपल्या नोंदीमध्ये दुरुस्ती करण्यासाठी आपणास https://voters.eci.gov.in या संकेतस्थळाला भेट देता येईल, असे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी आवाहन केले आहे.

# विद्यापीठीय ब विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयास यश



देगलूर(प्रतिनीधी):काल ३० ऑगस्ट रोजी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेड व स्वामी विवेकानंद महाविद्यालय,शिरूर ताजबंद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ब विभागीय बॅडमिंटन स्पर्धेत देगलूर महाविद्यालयास मुलांचा व मुलींचा दोन्ही संघास तृतीय पारितोषिक प्राप्त झाले आहे.या संघास प्रशिक्षक म्हणून डॉ. निरजकुमार उपलंचवार यांचे मार्गदर्शन लाभले तसेच प्रा.वावधाने दीपक,प्रा.हाके सिताराम, यांचा सहकार्य लाभले आहे. या मुलांच्या संघात प्रतिनिधित्व करणारे देगलूर महाविद्यालयतील खेळाडू वाघमारे विशाल, बंदमवार केदार, इबितदार गोरोबा,कांबळे आकाश,घुळेकर सुनील, देवकत्ते नवनाथ तर मुलींच्या संघात इंगोले सृष्टी,गुजलवाड मयुरी,सुर्यवंशी पल्लवी, तलवारे निकिता यांनी संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

यांच्या यशाबदल अडत व्यापारी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष प्रकाश पाटील बेम्बरेकर, उपाध्यक्ष जनार्धन चिद्रावार, सहसचिव राजकुमार महाजन,कोषाध्यक्ष विलास तोटावार यांच्यासह संस्थेच्या कार्यकारिणी मंडळाचे सदस्य डॉ. कर्मवीर उनग्रतवार,देवेंद्र मोतेवार, नारायणराव मैलागिरे, सूर्यकांत नारलावार,गंगाधरराव जोशी,रविंद्र अप्पा द्याडे, चंद्रकांत नारलावार, गुरुराज चिद्रावार,विजय उनग्रतवार, सुभाषराव सांगवीकर,गोविंदप्रसाद झंवर यांच्यासह महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मोहन खताळ ,उपप्राचार्य डॉ. अनिल चिद्रावार ,उपप्राचार्य प्रा. उत्तमकुमार कांबळे,पर्यवेक्षक संग्राम पाटील ,कार्यालय अधीक्षक गोविंद जोशी व सर्व प्राध्यापक , कर्मचारी आणि विद्यार्थी या विजयी खेळाडूंचे अभिनंदन केले आहे.

# बाभळगाव महाविद्यालयाच्या दोन विद्यार्थी पैलवानांचे कुस्ती स्पर्धेत यश



बाभळगाव : दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ, बाभळगाव द्वारा संचलित कै. व्यंकटराव देशमुख महाविद्यालय, बाभळगाव येथील दोन विद्यार्थी पैलवानांनी लातूर तालुका स्तरीय मौजे बोरगाव काळे येथे संपन्न झालेल्या कुस्ती स्पर्धेत घवघवीत यश संपादन केले आहे. त्यामध्ये ९० किलो वजनी गटात रमण प्रशांत माने यांनी प्रथम तर आदित्य कांबळे यांनी ६१ किलो वजनी गटात द्वितीय क्रमांक पटकावून बाभळगाव महाविद्यालयाची दरवर्षीची विजयी परंपरा कायम राखली आहे.

या अगोदर रमण माने यांचा कर्मवीर केसरी, बारामती कुस्ती असोसिएशन यांच्यावतीने कुस्तीसाठीचा विशेष सन्मान प्राप्त झाला आहे. त्यांनी खाशाबा नावाच्या मराठी चित्रपटात पैलवानाची भूमिका बजावली आहे. दोन्ही पैलवानांचे एका विशेष कार्यक्रमांमध्ये महाविद्यालयाच्या वतीने अभिनंदन करण्यात आले.

या यशाबद्दल यशस्वी पैलवानांचे दयानंद शिक्षण प्रसारक मंडळ बाभळगावचे मार्गदर्शक मा. दिलीपरावजी देशमुख साहेब, अध्यक्ष आमदार धीरज विलासरावजी देशमुख, सचिव शाम देशमुख सर्व संचालक मंडळ, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दुष्यंत कटारे, क्रीडा संचालक डॉ. वैशाली माढेकर, डॉ. नाना जाधव, डॉ. नरेंद्र देशमुख, डॉ. अजित भांजी, डॉ.मा.ना. गायकवाड, प्रा. चंद्रकांत मोरे, डॉ.अभिजीत बादाडे, डॉ.अंगद कोते, डॉ. दशरथ भिसे, डॉ. पांडुरंग मुंढे, प्रा. संदिपान चेवले, सर्व प्राध्यापक, विद्यार्थी, शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन केले.

# वसतिगृहातील जीवन म्हणजे सर्वांग सुंदर जीवन :डॉ. प्रमोद तोष्णीवाल




लातूर: दयानंद शिक्षण संचलित, दयानंद मुलांच्या वसतिगृहाचे उद्धाटन कार्यक्रमास विशेष अतिथी म्हणून प्रसिद्ध बालरोग तज्ज्ञ मा. डॉ. प्रमोदजी तोष्णीवाल उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते वसतिगृहाचे उद्धाटन करण्यात आले. या उद्धाटन समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड होते तर दयानंद विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा.भाऊसाहेब सरवदे व दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी आणि दयानंद कला कनिष्ठ महाविद्यालयाचे माजी उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. प्रमोदजी तोष्णीवाल यांनी आपल्या उद्धाटनपर मार्गदर्शनात विद्यार्थ्यांना संबोधित करताना असे प्रतिपादित केले की, मी प्राथमिक ते वैद्यकीय पदव्युत्तर पदवी पर्यंतचा एकूण २५ वर्षाचा शैक्षणिक कालावधी वसतिगृहात राहून पूर्ण केलेला आहे.

'Hostel life is Beautiful Life'वसतिगृहातील जीवन म्हणजे नवीन जीवन जगणे आहे. तेथील संस्कृती सामूहिक मन घडवून आव्हाने व स्पर्धेतून आपले उत्तम करिअर घडविणारे ते एक व्यासपीठ आहे. विद्यार्थ्यांनी वसतिगृहातील निवास म्हणजे शिक्षा नसून स्वतःला स्वयंशिस्त लावण्याचे एक माध्यम आहे असा दृष्टिकोन मनामध्ये ठेवावा. वसतिगृह आणि शिक्षण यांचे नाते असामान्य आहे. जिथे वसतिगृह व शिक्षण संपते तिथेच विद्यार्थ्याचे शैक्षणिक जीवनही संपते. पूर्वी गुरुकुलात राहून विद्यार्थी जसा आपला बौद्धिक आणि मानसिक विकास घडवून आणत असत.अगदी त्याप्रमाणेच विद्यार्थ्यांनी वसतिगृहामध्ये राहुन बौद्धिक, मानसिक व शारीरिक विकास घडवावा. वेगवेगळी कौशल्यप्राप्त मित्रांमध्ये राहून स्वतःमध्ये देखील तशी कौशल्य रुजविता येतात. विद्यार्थ्यांनी आपला माईंडसेट वाढवण्यासाठी सहा पद्धतीचा अवलंब करणे गरजेचे आहे. त्यामध्ये आनंदाने संधी स्वीकारणे, शिकण्याचा अभिप्राय,जिज्ञासा जोपासणे, केवळ प्रतिभेवर नाही तर प्रयत्नावर जोर द्या व शिकण्याची आवड निर्माण करा, अशा या सर्व गोष्टीवर विद्यार्थ्यांनी विचार करुन पुढे जावे. मनामध्ये प्रश्न निर्माण झाले पाहिजेत आणि त्या प्रश्नांची उत्तरे टीम वर्क म्हणून मित्राच्या सहवासातून मिळवली तरच आपल्या ध्येयाची निश्चितता होते.स्वतःमध्येच आवड तयार करून मुलांनी विविध कौशल्यावर प्राविण्य मिळवावे. विद्यार्थ्यांनी आपल्या जीवनात आई-वडील आणि शिक्षकांचा नेहमी आदर करावा. याप्रसंगी विद्यार्थ्यांनी विचारलेल्या प्रश्नांना त्यांनी मनसोक्तपणे उत्तरे दिली.

या उद्धाटन समारंभाचे अध्यक्ष दयानंद कला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ .शिवाजी गायकवाड यांनी आपल्या मार्गदर्शनात वसतिगृहातील विद्यार्थ्यांशी संवाद साधताना दहावी बारावी म्हणजे आपल्या जीवनाला कलाटणी देणारे वर्ष असतात. आपले जीवन सुंदर करण्यासाठी मेहनत करण्याशिवाय पर्याय नाही. उत्कृष्ट बनण्याची प्रेरणा वसतिगृहातील जीवनच देत असते. वसतिगृहात राहणारे विद्यार्थी हे बहुभाषिक असतात त्यांच्याकडून आपल्याला अनेक भाषा,अभ्यासाचे कौशल्य व नीटनेटकेपणा आदी गुण शिकता येतात. दयानंद शिक्षण संस्था ही उत्तम नागरिक तयार करण्याचे सुसंस्कृत केंद्र असून त्याचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा व आपले उत्तम करिअर घडवावे.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे जनसंपर्क अधिकारी व माजी उपप्राचार्य प्रा. अनिलकुमार माळी यांनी केले. त्याचबरोबर दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. भाऊसाहेब सरवदे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. व्यंकट कैले व आभार प्रा.गोपाळ लोहिया यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी वसतिगृह अधीक्षक प्रा. एस.डी.पवार यांनी परिश्रम घेतले.

# चाकूरचा महाराजा गणेश मंडळाच्या अध्यक्षपदी अर्जुन भोईटे यांची निवड





चाकूर /प्रतिनिधि: चाकूर तालुक्यामध्ये प्रथमच महाराजा गणेश मंडळ युवक कार्यकर्त्यांनी नुकतीच जाहीर केली असून या बैठकीमध्ये अर्जुन भैया भोईटे यांची अध्यक्षपदी सर्वानुमते निवड करण्यात आली यावेळी कार्यकारणी मध्ये उपाध्यक्षपदी कृष्णा येईलवाड तर सचिव पदी शोएब नदाफ यांची निवड करण्यात आली असून यावेळी असंख्य मोठ्या प्रमाणात युवक आणि चाकूर गणेश भक्त उपस्थित होते.

# दुरूस्तीकरिता शहरातील काही भागाचा वीजपुरवठा रविवारी बंद राहील

लातूर / प्रतिनिधी: वीजयंत्रणेच्या तातडीच्या दुरूस्ती व देखभाली करिता १३२ केव्ही. एम.आय.डी.सी, अतिउच्च दाब उपकेंद्र तसेच ११ केव्ही दयानंद व ११ केव्ही बांधकाम भवन वीजवाहिनीवरील लातूर शहर शाखा क्रमांक ०९ आणि ०७ अंतर्गत येणाऱ्या परिसराचा वीज पुरवठा उद्या रविवार ( दि.१ सप्टेंबर) रोजी सकाळी ०९ ते दुपारी ०२ वाजे दरम्यान वीज पुरवठा बंद राहील. संबंधीत वीजग्राहकांनी नोंद घेवून सहकार्य करावे असे आवाहन महावितरणने केले आहे.

लातूर शहराच्या ११ केव्ही दयानंद वीजवाहिनीवरील लातूर शहर शाखा क्रमांक ०९ अंतर्गत येणाऱ्या प्रकाश नगर (पुर्व व पश्चिम बाजू), कपिल नगर, खाडगाव रोड वरील पुर्व व पश्चिम बाजू, पारिजात सोसायटी, तुळजाई हॉस्पिटल जवळील एरिया, एमएसईबी कॉलनी, खाडगाव स्मशान भूमी पाठीमागील बाजू, जिजामाता नगर, सरस्वती शाळेजवळील एरिया, राम रहीम नगर, सदाशिवनगर, इंदिरा गांधी शाळेजवळील एरिया, साठे वीट भट्टी जवळील भाग, प्रकाश नगर रोडवरील पूर्व बाजू व पश्चिम बाजू पुर्ण, ज्ञानदेव मंगल कार्यालय, भक्ती शक्ती मंगल कार्यालय, भगवान शाळा, पार्क स्ट्रीट, गिरवलकर नगर, अमलेश्वर नगर, पंचवटी नगर, चौधरी नगर, पठाण नगर, विकास नगर, गित्ते मॅडम डीपी, न्यू भाग्य नगर, वाल्मिकी नगर, ओल्ड रेल्वे लाईन वरील उत्तर व दक्षिण बाजू, नरहरे क्लासेस जवळील भाग, जीएस पाटील मळा, दयानंद कॉलेज, खाडगांव रोडची पश्चिम बाजू, इत्यादी भागातील वीज पुरवठा बंद राहील.

११ केव्ही बांधकाम भवन वीजवाहिनीवरील लातूर शहर शाखा क्रमांक ०७ अंतर्गत येणाऱ्या माणिकराव जाधव मंगल कार्यालय, पांडुरंग नगर, संस्कृती नगर, कन्हैया नगर, गोपाळ नगर, गोविंदा बार, रविशंकर शाळा, उत्तरादी मठ, राजनंदा शाळा, वासणगाव रोड, रामगिरी नगर, दालचिनी हॉटेल, परिवार सोसायटी, फेरे डीपी, कृषी नगर, अयोध्या कॉलनी, तेरणा कॉलनी, सह्याद्री हॉस्पिटल, शाहूपुरी कॉलनी, यमुना सोसायटी, कोकाटे नगर, गुणगुणे नगर, आर जे कॉम्प्लेक्स, ड्रायव्हर कॉलनी, इंजिनिअरिंग कॉलनी, पत्तेवार कॉलनी, आदर्श कॉलनी, गणेश नगर, देशपांडे कॉलनी, जुना औसा रोड, लक्ष्मी कॉलनी, महसूल कॉलनी, विठ्ठल नगर,, इत्यादी भागातील वीज पुरवठा सकाळी ९ ते दुपारी २ वाजेपर्यंत बंद राहील. कृपया सर्व वीज ग्राहकांनी याची नोंद घ्यावी. त्याचप्रमाणे सदर काम वरील वेळेपूर्वी पूर्ण झाल्यास वीज पुरवठा त्वरीत चालू करण्यात येईल

# समाजातील वंचित घटकांना न्याय देण्यासाठीच वंचित बहुजन आघाडीत प्रवेशाचा निर्णय : विनोद खटके



लातूर : समाजातील सर्व वंचित घटकांना सर्वांगीण न्याय देण्याच्या उद्देशानेच आपण सोमवार, दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या प्रमुख उपस्थितीत वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करण्याचा निर्णय घेतला असल्याची माहिती व्हि.एस. पँथर्स सामाजिक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष विनोद खटके यांनी शनिवारी पत्रकारांशी बोलताना दिली.

मागच्या अनेक वर्षात लातूरच्या सामाजिक क्षेत्रातील सर्वात मोठे संघटन, अशी ओळख व्हि.एस. पँथर्सने निर्माण केली आहे. आपल्या व्हि.एस. पँथर्सच्या माध्यमातून आतापर्यंत पाच सर्वधर्मिय सामुहिक विवाह सोहळे, अनेक रक्तदान शिबिरांचे आयोजन, स्पर्धा परिक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन शिबीर, शिक्षण हक्क कायद्याअंतर्गत हजारो विद्यार्थ्यांना शाळा - महाविद्यालयात प्रवेश मिळवून देण्याबरोबरच विविध सामाजिक - राजकीय प्रश्नांवर मोर्चे-धरणे आंदोलने, रास्ता रोको आंदोलने केली असून नुकत्याच पार पडलेल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त जिल्हयात ३०० शाखा व एक लाख तरूणांची सदस्य नोंदणी मोहिम राबवली असल्याचे विनोद खटके यांनी सांगितले.

व्हि. एस. पँथर्स संघटनेच्या स्थापनेपासून राजर्षी शाहु - महात्मा फुले - डॉ. बाबासाहेब आंबेडकर या पुरोगामी विचारसरणीवर सर्वांना सोबत घेऊन वाटचाल करण्याचे काम केले आहे. यापुढील काळातही याच विचारसरणीवर आपण मार्गोत्क्रमण करणार आहोत, असे सांगून विनोद खटके पुढे म्हणाले की, आतापर्यंत केलेल्या सामाजिक कार्याच्या बळावर समाजातील तळागाळातील वंचित घटकांना न्याय देण्यासाठी आणि पुरोगामी विचारांची मुहुर्तमेढ रोवण्यासाठी दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी वंचित बहुजन आघाडीत आघाडीचे संस्थापक - अध्यक्ष अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थितीत आपल्या असंख्य समर्थकांसह प्रवेश करत आहोत. या प्रवेशासाठी आघाडीच्या नेत्यांकडे आपण कोणत्याही प्रकारची अपेक्षा ठेवलेली नाही की कसली मागणी केलेली नाही. आघाडीचे संस्थापक अॅड. आंबेडकर जो आदेश देतील त्याप्रमाणेच आपण काम करणार आहोत. लातूरमध्ये सोमवारी होणाऱ्या पक्षप्रवेश सोहळा व महामेळाव्यात तेच आपल्या विषयीची भूमिका मांडतील असेही विनोद खटके यांनी सांगितले. आगामी विधानसभा निवडणूकीच्या पार्श्वभूमीवर वंचित बहुजन आघाडीची भूमिका अत्यंत महत्वाची ठरणार आहे. त्यामुळे अॅड. प्रकाश आंबेडकर यांच्या आदेशाप्रमाणे आपण व आपले सर्व सहकारी कार्यरत राहू. आपल्यासमवेत व्हि. एस. पँथर्सचे सर्व पदाधिकारी - कार्यकर्ते वंचित बहुजन आघाडीत प्रवेश करणार असल्याचे विनोद खटके यांनी स्पष्ट केले. त्याचप्रमाणे केवळ आगामी विधानसभा निवडणूकच नव्हे तर यापुढील काळात होणाऱ्या सर्व निवडणूकांमध्ये आपण अॅड. आंबेडकर यांच्या आदेशानुसार काम करणार असल्याचेही विनोद खटके यांनी सांगितले. याप्रसंगी सचिन मस्के, अमोल सुरवसे,किरण पायाळ, प्रतिक कांबळे, आनंद जाधव, विकार अलताब देशमुख, असदभाई शेख, राहुल कांबळे, किरण केंद्रे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

# क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांचा दौरा

लातूर, दि. ३१ : राज्याच्या क्रीडा व युवक कल्याण, बंदरे विभागाचे मंत्री संजय बनसोडे हे रविवार, १ सप्टेंबर, २०२४ रोजी लातूर जिल्हा दौऱ्यावर येत आहेत. त्यांचा दौरा कार्यक्रम पुढीलप्रमाणे आहे.

क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. बनसोडे यांचे १ सप्टेंबर रोजी सकाळी ६.३० वाजता लातूर रेल्वे स्टेशन येथे आगमन होईल व मोटारीने शकुंतला निवासस्थानकडे प्रयाण करतील. सकाळी १० वाजता लातूर येथून मोटारीने उदगीरकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता उदगीर शहरातील नळेगाव रोडवरील ललित मंगल भवन येथील स्वा. सै. मन्मथअप्पा चिल्ले शताब्दी आयोजन समिती व आर्य समाज करडखेलच्यावतीने स्वा. सै. मन्मथअप्पा भद्रअप्पा चिल्ले (पू. आनंदमुनिजी) यांच्या गौरव शताब्दी समारंभास उपस्थिती. सकाळी ११.४० वाजता उदगीर शहरातील कौळखेड रोडवरील वसंतराव नाईक चौक येथे आनंद व्यसनमुक्ती केंद्राच्या उद्धाटन सोहळ्यास ते उपस्थिती. दुपारी १२ वाजता उदगीर शहरातील कौळखेड रोडवरील शिवम फंक्शन हॉल येथे महामहीम राष्ट्रपती द्रोपदी मुर्मू यांच्या ४ सप्टेंबर, २०२४ च्या उदगीर दौरा अनुषंगाने सर्व पत्रकार बांधवांशी संवाद व बैठकीस उपस्थित राहतील. सायंकाळी ४ वाजता उदगीर येथे राखीव. त्यानंतर सोईनुसार उदगीर येथून मोटारीने लातूरकडे प्रयाण करतील.

# एकादशी - प्रदोष व्रतातुन उपासनेसाठी ताकद लाभते

**अॅड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- मनुष्याला परमार्थिक जीवनात काही साध्य करायचे असेल तर एकादशी प्रदोष सोमवार ही वृत्ते करण्यास शास्त्रांनी सांगितले आहे यामुळे अंतकरण शुद्ध सात्विक होऊन साधनेत बळ मिळते,असे विचार ह.भ.प.श्री. ज्ञानराज महाराज यांनी व्यक्त केले शुक्रवारी नाथ मंदिरात श्रावण मास अनुष्ठान अंतर्गत चक्रीभजनाच्या सेवेनंतर ग्रंथराज ज्ञानेश्र्वरी च्या निरूपणात ते बोलत होते १८ व्या अध्यायातील नव्या श्र्लोकातील पाच सहा सात आठ या ओव्यांवर सलग संपूर्ण श्रावण ज्ञानराज महाराजांनी कर्म स्थिरता निष्काम कर्म विश्र्वास विनम्रता विवेक आणि समर्पण याचे चिंतन आणि नाम साधनेची किमया व सामर्थ्य यावर अत्यंत सरळ सोप्या भाषेत पण सुमधुर असे रसाळ वाणीत चिंतन मांडले.



कर्म हाच धर्म हे लक्षात घ्यावे जसे कर्म तसे फळ जशी इच्छा तसे कर्म कर्मात निरपेक्षता असेल आणि मी केले हा भाव स्पर्श करत नसेल तर ते कर्म निश्र्चितपणे आपल्याला अत्यंतिक समाधान आणि फलश्रुती देऊन जाते.

# गोपाळ कृष्णाच्या जय जयकारात नाथ मंदिरात गोवर्धन उत्सव संपन्न

**अॅड. शाम कुलकर्णी**

औसा / प्रतिनिधी- कर नखाग्री धरिला गिरी , तूच की रे मुरारी, अशा परमात्मा भगवान श्रीकृष्णाने इंद्राला आलेला गर्व हरण करून बाळ गोपाळांना महाप्रलय पावसात करंगळीवर गोवर्धन पर्वत धरून त्याखाली सुरक्षित ठेवून रक्षण केले तो हा सर्व गोपाळांचा आनंदोत्सव म्हणजे गोवर्धन उत्सव होय असे यावेळी गोवर्धन उत्सवाची महती सांगताना ज्ञानराज महाराज म्हणाले. श्रावण मासाच्या अनुष्ठानत श्रीकृष्ण जन्माष्टमी सह गोवर्धन उत्सवाला अनन्य साधारण महत्व असल्याचे सांगून आपण भगवान श्रीकृष्णाचा सातत्याने नामघोष चिंतन आणि ध्यान केल्यास आपले सर्व संकटांतून मुक्तता होते असे महाराज म्हणाले. भगवान श्रीकृष्णाची आरती पूजन करून श्रीकृष्ण जय जयकारात गोवर्धन उत्सव संपन्न झाला यावेळी सद्गुरु श्री गहिनीनाथ महाराज औसेकर, श्री रवींद्रनाथ महाराज, श्री श्रीरंग महाराज,श्री अनिरूद्ध महाराज, चि.गितेश्र्वर श्रीरंग महाराज,व महाराज कुटुंबीय यांच्यासह अनुष्ठानातील सेवेत सहभागी असलेले सर्व सदभक्त भावीक उपस्थित होते.

यशवंत

धाराशिव जिल्हा

रविवार दि. ०१ सप्टेंबर २०२४

३

कार्यालय/फॅक्स : ०२४७२-२२८९१२, E-mail malikarjun.sonawane @gmail.com


## जिल्ह्यातील डेंग्यू रोगास प्रतिबंध उपायोजना तात्काळ करा - खा. राजेनिंबाळकर

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील डेंग्यू रोगाचा प्रसार मोठ्या प्रमाणात झाला असल्यामुळे रुग्णांचे प्रमाण जिल्हाभरात दिवसेंदिवस वाढत चालले आहे. डेंग्यू व डेंग्यू सदृष्य आजारामुळे जिल्ह्यातील अनेक नागरीक सातत्याने आजारी पडत आहेत. या साथ रोगास प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन अटकाव करणे गरजेचे आहे. यासाठी खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाधिकाऱ्यांना जिल्ह्यातील डेंग्यू रोगास प्रतिबंधात्मक उपाययोजना तात्काळ करण्याचे एका पत्राव्दारे सुचीत केले आहे. डेंग्यूमुळे उमरगा तालुक्यातील ओम साळुंके व सत्यजित देशमुख या दोन शालेय विद्यार्थ्यांचा उपचारा दरम्यान मृत्यू झाला आहे. तर जिल्ह्यातील डेंग्यू साथ रोगास प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकीत्सक यांना प्रतिबंधात्मक उपाययोजना करुन शालेय विद्यार्थ्यांचे आरोग्य तपासणी व गावोगावी औषध फवारणी तसेच इतर



प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यासाठी सुचविले आहे.

# महिलांनी आहारात भरड धान्याचा समावेश करावा - येरमे

## राष्ट्रीय पोषण अभियानावर मल्टिमीडिया प्रदर्शन प्रारंभ





धाराशिव दि.३० (प्रतिनिधी) – कुटुंबातील सदस्यांचे अशक्तपणा, हिमोग्लोबीनची कमतरता आणि स्थूलपणा कमी करण्यासाठी नियमित ज्वारी, नाचणी, वरी, राळा यासारख्या भरड धान्यापासून बनविण्यात येत असलेल्या खाद्यपदार्थांचा नियमित आहारात समावेश करावा. यामध्ये मोठ्या प्रमाणात पोषणमूल्य आहे, निरोगी व सुदृढ कुटुंब बनवावे असे प्रतिपादन तहसिलदार गोविंद येरमे यांनी केले.

केंद्रीय संचार ब्युरो, माहिती आणि प्रसारण मंत्रालय सोलापूर व महिला आर्थिक विकास महामंडळ धाराशिव यांच्या वतीने शांताई मंगल कार्यालय येथे राष्ट्रीय पोषण अभियान व आहारात भरड धान्यांचा समावेश या विषयावर आयोजित मल्टिमीडिया प्रदर्शनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी तालुका कृषी अधिकारी डीबी रितापुरे, सहाय्यक प्रचार अधिकारी अंबादास यादव, जिल्हा समन्वयक अधिकारी शोभा कुलकर्णी, बँक ऑफ महाराष्ट्राचे शाखा व्यवस्थापक योगेश कंदले, नायब तहसीलदार किशोर कुलकर्णी, व्यवस्थापक किशोर टोम्पे, ज्ञानदीप लोकसंचलित साधन केंद्राचे अध्यक्ष जगदेवी पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. तर कमी खर्चात जास्त उत्पादन देणारे ज्वारी, नाचणी, मका, वरी, राळा, कोदो यासारखे पीक अल्पभूधारक शेतकऱ्यांसाठी खूप फायदेशीर आहे. भरड धान्यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणामध्ये निर्यात व्हावे या उद्देशाने केंद्र सरकारकडून मागील दोन वर्षापासून शेतकरी आणि सामान्य जनतेमध्ये मोठ्या प्रमाणात जनजागृती करण्यात येत असल्याचे श्री येरमे यांनी सांगितले. प्रधानमंत्री अन्न प्रक्रिया योजना आणि मुख्यमंत्री अन्न प्रक्रिया योजनांचा लाभ घेऊन महिला बचत गटांनी अन्नप्रक्रिया उद्योग क्षेत्रात पुढाकार घ्यावा,असे आवाहन डी बी रितापुरे यांनी केले. तसेच महिला बचत गटांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी बँक ऑफ महाराष्ट्र कडून राबवन्यात येत असलेल्या विविध योजनांची माहिती यावेळी शाखा व्यवस्थापक योगेश कंदले यांनी दिली. तर शोभा कुलकर्णी यांनी माविमकडून महिला बचत गटासाठी राबवण्यात असलेल्या विविध उपक्रमांची सविस्तर माहिती दिली.कार्यक्रमाचे प्रास्ताविक अंबादास यादव यांनी केले. सूत्रसंचालन किशोर टोंपे व सखु सोनकांबळे यांनी तर आभार पांडुरंग गायकवाड यांनी मानले. ज्ञानदीप लोकसंचालित साधन केंद्र यांची ११ वी वार्षिक सर्वसाधारण सभा यावेळी घेण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून दीप प्रज्वलन आणि इतनी शक्ती हमे देना दाता या प्रार्थनेने करण्यात आले.

प्रदर्शनाच्या अनुषंगाने उपजिल्हा रुग्णालय कडून ११० लोकांचे हिमोग्लबिन, ब्लड प्रेशर, शुगर, सीबीसी आणि एचआयव्हीची तपासणी करण्यात आली. महिला बचत गटाकडून भरड धान्यापासून बनवण्यात आलेल्या आहार प्रात्यक्षिक स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते आणि भारत विद्यालयाच्या विद्यार्थिनींसाठी प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते विजेत्यांना प्रमाणपत्र व पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. बचत गटाकडून विविध घरगुती उपयोगात येणाऱ्या वस्तूंचे विक्री स्टॉल लावण्यात आले होते. सदर प्रदर्शन ३१ व १ सप्टेंबरपर्यंत सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत सर्व नागरिकांसाठी खुले असणार आहे.

कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी समन्वयक संयोगिनी महानंदा अंगबरे, सखु सोनकांबळे, अयोध्या बनसोडे, राणी मोरे, शिल्पा दिक्षित, स्वालेहा मुल्ला, छाया शिंदे, सुनिता पाटील, सुरेखा पाटील, संगिता मुळे, छाया कांबळे, अनिता शिंदे, कमल सास्तुरे, अनुसया जाधव, संगिता सोनकांबळे,महादेवी माळी, सुरज जाधव आणि साईराज राऊळ यांनी परिश्रम घेतले.

## रँगिंग हे अक्षम्य कृती असून त्यामुळे अनेकांचे करिअर उद्ध्वस्त झाले - इज्जपवार

परंडा दि.३१ (प्रतिनिधी) – विद्यार्थी दशेत असताना वरिष्ठ वर्गाचे विद्यार्थी कनिष्ठ वर्गातील विद्यार्थ्यांना आपला दबदबा निर्माण करण्यासाठी रँकिंग करतात. रँगिंग हे अक्षम्य कृत्य आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांचे करिअर उद्धुस्त झाले असल्याचे प्रतिपादन पोलीस निरीक्षक विनोद इज्ञपवार यांनी केले.

परंडा येथील शिक्षण महर्षी रा.गे. शिंदे महाविद्यालयात शिंदे महाविद्यालय, डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ व महाराष्ट्र शासनाच्यावतीने आयोजित रँकिंग कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ सुनील जाधव, उपप्राचार्य डॉ महेशकुमार माने, एँटी रँगिंग समितीचे चेअरमन तथा सांस्कृतिक विभाग प्रमुख डॉ शहाजी चंदनशिवे यांची उपस्थिती होती. यावेळी महाविद्यालयातील कनिष्ठ वरिष्ठ विभागातील प्राध्यापक विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. पुढे बोलताना इज्ञपवार म्हणाले की, विद्यार्थ्यांनी जाणून-बुजून वाईट मार्गाला जाऊ नये असे त्यांनी विविध उदाहरणाचे दाखल देऊन पटवून सांगितले. तर आई-वडिल आपल्या मुला-मुलींना महाविद्यालयामध्ये काबाड कष्ट करून शिक्षण घेण्यासाठी पाठवतात. त्या कष्टाची जाणीव ठेवून विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरच्या संधी उपलब्ध कराव्यात, असे आवाहन त्यांनी केले. तसेच विद्यार्थ्यांनी प्रकर्षाने यशाचा मार्ग कसा स्विकारावा ? या संदर्भात स्वतःचे उदाहरण देत मी कसा घडलो ? यावर त्यांनी विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. तर काही अनुचित प्रकार घडल्यास त्यांनी आपल्या प्राध्यापकांना किंवा माझ्याशी संपर्क करावा, पोलीस प्रशासन आपल्या संरक्षणासाठी कटिबद्ध असल्याचे आश्वासन त्यांनी दिले . कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी पोलीस कॉन्स्टेबल भांगे श्रीकांत, प्रा तानाजी फरतडे, प्रा विजय जाधव, प्रा कीर्ती नलवडे, प्रा प्रतिभा माने, प्रा मोरवे यांच्यासह, हनुमंत मार्तंडे प्रमोद केसकर, वसंत राऊत यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व प्रास्ताविक प्रा डॉ शहाजी चंदनशिवे यांनी तर आभार प्रा विजय माने यांनी मानले तर राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## जिल्ह्यात ३ सप्टेंबरपासून अडल्ट बीसीजी लसीकरण सुरु

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – जिल्ह्यातील १८ वर्षांवरील पात्र, पुढील मागील ५ वर्षातील सर्व क्षयरुग्ण, मागील ३ वर्षातील क्षय रुग्णांच्या सहवासातील व ६० वर्षावरील सर्व नागरिकांना दि.३ सप्टेंबरपासून अडल्ट बीसीजी लसीकरण सुरू करण्यात येणार असल्याची माहिती माता व बाल संगोपन अधिकारी डॉ कुलदीप मिटकरी यांनी दिली.

आरोग्य विभागांतर्गत जिल्हा स्तरीय अधिकारी पर्यवेक्षक यांची सुरु करण्यात येणाऱ्या लसीकरण संदर्भात महत्वाची बैठक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सतीश हरिदास व जिल्हा शल्य चिकित्सक डॉ नागनाथ धर्माधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली माता व बाल संगोपन अधिकारी डॉ मिटकरी यांच्या अध्यक्षतेखाली दि.२९ ऑगस्ट रोजी घेण्यात आली. या बैठकीस जिल्हा क्षयरोग अधिकारी, निवासी वैद्यकीय अधिकारी, जिल्हा स्तरीय पर्यवेक्षक, तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधीक्षक, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी, आरोग्य कर्मचारी व्हिडिओ कॉन्फरन्सद्वारे ऑनलाईन प्रशिक्षणास उपस्थित होते. या लसीकरण मोहिमे अंतर्गत जिल्ह्यामध्ये दि.३ सप्टेंबरपासून १८ वर्षावरील पात्र लाभार्थ्यांचे मागील ५ वर्षांतील सर्व क्षयरुग्ण, मागील ३ वर्षातील क्षय रुग्णांच्या सहवासातील, ६० वर्षावरील सर्व, मधुमेह रुग्ण,

धुम्रपान करणारे, बॉडी मास इंडेक्स (BMI) १८ पेक्षा कमी अपात्र लाभार्थ्यांना लसीकरण देण्यात येणार नाही. गरोदर माता, स्तनदा माता सद्यस्थितीत क्षय रोगाचे उपचार घेत असलेले, क्षयरोग प्रतिबंधात्मक उपचार (TPT) घेत असलेले एचआयव्ही, कर्करोग्रस्त, अवयव प्रत्यारोहण झालेल्या व्यक्ती, गंभीर आजार, दुर्धर आजार असलेले व्यक्ती, मागील ३ महिन्यांत रक्त चढविलेल्या व्यक्ती, बीसीजी अथवा इतर कोणत्याही लसीमुळे गंभीर दुष्परिणाम झालेल्या व्यक्ती जोखीमयुक्त वर्तन असणाऱ्या व्यक्ती या पात्र यादीनुसार दि.३ सप्टेंबरपासून प्रत्यक्ष लसीकरण करण्यात येणार आहे. हे लसीकरण सर्व प्रशिक्षित लस टोचक (व्हॅसिनेटर) यांच्याद्वारे नियमित लसीकरण सत्राचे दिवस वगळून या लसीकरणाचे नियोजन करण्यात येणार आहे. यासाठी सर्व आरोग्य कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण देण्यात आले आहे. या मोहिमेमधून देण्यात येणारे अडल्ट बीसीजी व्यक्तींची लस ती अत्यंत सुरक्षित असून ही लस घेतल्यामुळे लाभार्थ्यांना क्षयरोगाबाबत संरक्षण मिळणार आहे. केंद्र सरकारचे क्षयरोगाचे २०२५ अखेरपर्यंत दूरीकरण करण्याचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अडल्ट बीसीजी लसीकरण हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा मानला जातो.

जिल्हाधिकारी डॉ सचिन ओंबासे व मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ मैनक घोष यांच्या मार्गदर्शनाखाली ही मोहीम यशस्वी करण्यासाठी नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे पात्र सर्व लाभार्थ्यांनी अडल्ट बीसीजी लसीकरण घेऊन जिल्ह्यातील मोहीम यशस्वी करण्यासाठी सहकार्य करावे, असे आवाहन डॉ मिटकरी यांनी केले आहे.

## पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडे लावली पाहिजेत - घोगरे



परंडा, दि.३१ (प्रतिनिधी) थोर संत महात्म्यांनी अधात्मांतुन मानवी जीवनावर अनंत उपकार केले आहेत.संताच्या शिकवणीचे आचरण करुन मानवी विकारांना बाजुला ठेवत जीवनामध्ये समृद्धी, सुख, समाधान, मिळवत आनंदी राहण्यासाठी मनाचे आरोग्य जपले पाहिजे. मुला-मुलींना उच्च शिक्षणाची प्रेरणा दिली पाहिजे. पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी प्रत्येकांनी झाडे लावली पाहिजेत असे आवाहन संत साहित्याचे अभ्यासक बाळासाहेब घोगरे यांनी दि.३० ऑगस्ट रोजी व्यक्त केले.

परंडा शहरातील काशीद गल्लीतील जय भवानी चौकात नाभिक समाजाच्यावतीने संत सेना महाराजांच्या पुण्यतिथीचा कार्यक्रम घेण्यात आला.यावेळी समाजप्रबोधनकार बाळासाहेब घोगरे व डा.आनंद मोरे यांचा संत सेना महाराजांच्या जीवनचरित्रावर व्याख्यानाचा कार्यक्रम घेण्यात आला.पुण्यतिथी निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम घेण्यात आले. दुपारी १२ वाजता संत सेना महाराजांच्या प्रतिमेचे पुजन करुन,पुष्पवृष्टी करण्यात आली.यावेळी डा. आनंद मोरे म्हणाले की,आई वडील व संताच्या उपकाराची जाणिव ठेवुन आदर्शवत जीवन कसे जगावे हे संत महात्मेकडुन शिकावे. महिलांचे आरोग्य व समस्या याविषयी मार्गदर्शन करताना पुढे म्हणाले की,महिला ही कुंटुबाचा कणा आहे. तीच्या आरोग्यावरच कुंटुबांचे आरोग्य निर्भर आहे.महिलांसाठी आरोग्याची पंचसुत्री सांगितली .तसेच चिंतामुक्त जीवन,ध्यानधारणा, व्यसनमुक्त कुंटुब,मुलींचे शैक्षणिक जीवन व आरोग्य, पर्यावरण,व्यायाम व सुर्यनमस्कार याविषयी सविस्तर माहिती दिली. यावेळी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमास नाभिक समाजातील महाराष्ट्र चॅंपीयन आप्पा काशीद,दिनकर काशीद, युवा नाभिक संघटनेचे जिल्हाध्यक्ष नागेश काशीद, व्हाईस आफ मिडीयाचे जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश काशीद, संतोष भालेकर, विशाल काशीद, सुरेश काशीद, ग्रामसेवक मनोज काशीद, जयंत काशीद, संजय काशीद, नागेश यादव, नागेश डाके, प्रितम डाके, सनी काशीद, रमेश काशीद, राहुल काशीद, गणेश काशीद, सचिन काशीद, प्रभु वाघमारे, अकुंश जमदाडे, बाबी काशीद,शुभम काशीद, ओंकार काशीद आदींसह समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थिते होती.

## जिल्ह्यातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे व स्मारकांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची काँग्रेसची मागणी




धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – मालवण येथील राजकोट किल्लयावरील छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा कोसळल्या प्रकरणी दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच धाराशिव जिल्ह्यातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे व स्मारकांचे रचनात्मक गुणांकन (स्ट्रक्चरल ऑडिट) करुन देखभाल व दुरुस्ती करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा काँग्रेस कमिटीच्यावतीने एका निवेदनाद्वारे जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मुख्यमंत्र्याकडे दि.३१ ऑगस्ट रोजी केली आहे.

दिलेल्या निवेदनात असे नमूद करण्यात आले आहे की, छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा दि.४ डिसेंबर २०२३ रोजी नौदल दिनी राजकोट किल्लयावर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या उपस्थितीत उभारण्यात आला होता. परंतू दि.२८ ऑगस्ट रोजी अवघ्या ८ महिन्यांमध्ये तो पुतळा कोसळला, ही घटना अत्यंत दुर्दैवी आणि वेदनादायी आहे. त्यामुळे संबंधित पुतळा उभारणारे ठेकेदार, पुतळ्याला परवानग्या देणाऱ्या शासकीय आस्थापना व अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करून योग्य ती कायदेशीर कारवाई करण्यात यावी. त्यामुळे भविष्यात अशा घटना होणार नाहीत. विशेष म्हणजे महाराष्ट्र ही महापुरुषांची भूमी असून त्यांचे पुतळे आणि स्मारके हे सर्वसामान्यांसाठी त्यांच्या विचारांचे आणि कार्याचे प्रेरणास्थान आहेत. परंतू जर अवघ्या ८ महिन्यांमध्ये एखाद्या पुतळ्याची ही अवस्था होत असेल तर ५०-६० वर्षे जुन्या पुतळ्यांचे अस्तित्व सुध्दा नक्कीच धोक्यात आले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व महापुरुषांच्या पुतळ्यांचे व स्मारकांचे रचनात्मक गुणांकन (स्ट्रक्चरल ऑडिट) करून त्याची देखभाल दुरुस्ती करण्यात यावी. असे केल्यास भविष्यात पुतळा कोसळण्याच्या घटनेची पुनरावृत्ती होणार नाही अशी सूचना वजा मागणी केली आहे. यावर काँग्रेसचे मुख्य जिल्हा संघटक राजाभाऊ शेरखाने, वरीष्ठ जिल्हा उपाध्यक्ष खलील सय्यद, जिल्हा उपाध्यक्ष प्रशांत पाटील, जिल्हा बँकेचे संचालक महबूब पटेल, धाराशिव तालुकाध्यक्ष विनोद वीर, धाराशिव शहराध्यक्ष अग्निवेश शिंदे, बाजार समितीचे संचालक उमेशराजे निंबाळकर, जिल्हा नियोजन समिती सदस्य सिद्धार्थ बनसोडे, महीला काँग्रेसच्या प्रदेश सरचिटणीस शीलाताई उंबरे, ओबीसी विभागाचे जिल्हाध्यक्ष धनंजय राऊत, अल्पसंख्याकचे आयुब पठाण, मानवाधिकार विभागाचे जिल्हा सरचिटणीस अशोक बनसोडे, अभय वीर, सौरभ गायकवाड, संजय गजधने, सुनील बडूरकर, आनंद बनसोडे, वसंत मडके यांच्या सह्या आहेत.

## आज धाराशिव येथे काँग्रेस कार्यकर्ता व बी.एल.ए. प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

### आमदार धीरज देशमुख यांच्यासह मान्यवर राहणार उपस्थित

धाराशिव दि.३१ (प्रतिनिधी) – राज्यातील विधानसभा निवडणुकीची घोषणा लवकरच होणार आहे. या निवडणुकीच्या अनुषंगाने प्रत्येक बूथ पातळीवरील तयारी कशी करावी व प्रचाराचे मुद्दे कोणते असावेत ? या विषयांवर जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या सर्व कार्यकर्त्यांसाठी रविवार दि.१ सप्टेंबर रोजी प्रशिक्षण शिबिराचेर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरास मराठवाडा विभाग समन्वयक म्हणून आ.धीरज विलासराव देशमुख यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित राहून मार्गदर्शन करणार आहेत.

महाराष्ट्रातील आगामी विधानसभा निवडणूक काँग्रेस पक्षासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे जिल्ह्यातील प्रत्येक मतदार संघातील सर्व बूथ प्रमुख (बीएलए), प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या शिबिरामध्ये येऊन काँग्रेस पक्षाची विचारधारा व महाराष्ट्र विधानसभा निवडणूक २०२४ प्रचारासाठी प्रमुख मुद्दे कोणते ? हे पहिल्या सत्रात तर दुसऱ्या सत्रात बूथ पातळीवरील बांधणी कशी करावी, बूथ कमिटीची कामे कोणती तसेच सोशल मीडिया बळकट करण्यासाठी काय करावे ? आदी महत्त्वाच्या बाबींवर विशेष भर दिला जाणार आहे. विशेष म्हणजे हे प्रशिक्षण एकतर्फी नसून पदाधिकारी, कार्यकर्ते व मार्गदर्शक यांच्यामध्ये साधला जाणार आहे. हे प्रशिक्षण दोन्ही सत्रात दिलेल्या वेळेनुसार होणार आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हे सत्र अतिशय महत्त्वाचे असल्यामुळे या सत्रा दरम्यान मोबाईल कोणालाही वापरता येणार नाही मात्र कार्यक्रमांमधील ब्रेकनंतर प्रत्येकाला मोबाईल वापरण्याची मुभा असेल. हे शिबिर धाराशिव शहरातील नगर परिषदेच्या छत्रपती शिवाजी महाराज नाट्यगृहात सकाळी १०.३० ते दुपारी १.३० वाजण्याच्या दरम्यान होणार आहे. त्यामुळे काँग्रेसच्या सर्व बूथ प्रमुख, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी या शिबिरात सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड धीरज पाटील यांनी केले आहे.

# नाभिक समाजाला सर्वतोपरी मदत करु : आ.अमित देशमुख

लातूर प्रतिनिधी : – लोकसभेला महाविकास आघाडी राज्यात विक्रमी मताने जिंकली तसेच विधानसभेलाही महाविकास आघाडी राज्यात जिंकेल असे सांगून येत्या विधानसभा, जिल्हा परिषद, पंचायत समिती महानगरपालिकेच्या निवडणुकीत नाभिक समाज व बारा बलुतेदारांना काँग्रेस पक्षाकडून संधी देण्यात येईल. नाभिक समाज कायम आमच्या पाठीशी उभा आहे, नाभिक समाजाच्या सर्व मागण्या पूर्ण करून नाभिक समाजाला सर्वतोपरी मदत करु असे राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा लातुरचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी म्हटले आहे.

लातूर शहरातील झिंगणप्पा गल्ली येथील महाराजा अग्रेसन भवन येथे श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त लातूर जिल्हा नाभिक समाजाच्या वतीने आयोजित केलेला नाभिक समाज बांधवाचा स्नेहमेळावा व गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा संपन्न झाला या प्रसंगी ते बोलत होते. या कार्यक्रमाचे अध्यक्ष ॲड. विजयकुमार चिखलीकर हे होते. तर माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर, भटके विमुक्त संघटनेचे प्रदेश अध्यक्ष हरिभाऊ गायकवाड, लातूर जिल्हा परिषदेचे माजी अध्यक्ष संतोष देशमुख, विलास सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन रवींद्र काळे, ट्वेंटीवन शुगरचे व्हाईस चेअरमन विजय देशमुख, महाराष्ट्र नाभिक महामंडळ उपाध्यक्ष रामदास पवार, लातूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे, शहराध्यक्ष जगन्नाथ गवळी, रंगनाथ घोडके, हरिश्चंद्र पांचाळ, मकबूल वलांडीकर, प्रा. श्रीकांत मुद्दे, अमोल सावंत, मनोज दिघे, अण्णा सुरवसे, महादेव माने, अशोक चिमकुरे, दीपक चापोलीकर आदींसह नाभिक समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रारंभी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी वारकरी संप्रदायाचे महान संत श्री संत सेना महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त झिंगणप्पा गल्ली येथील श्री संत सेना भवनात जाऊन श्री संत सेना महाराज यांच्या मूर्तीस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले.

या कार्यक्रमादरम्यान नाभिक समाजातील दहावी बारावी पदवी व पदवीत्तर परीक्षेत विशेष प्राविण्य मिळवलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचा माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला यावेळी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, नाभिक समाजाने आपल्या व्यथा मागण्या आमच्याकडे नोंदवल्या आहेत, नाभिक समाजाचा सन्मान करण्यासाठी आम्ही कायम तत्पर राहू, नांदगाव येथे नाभिक समाज भवन उभारायला मंजुरी देण्यात आली आहे, त्याला निधीही मिळाला आहे त्या कामाची वर्क ऑर्डर आठ दिवसात येईल. तसेच बोरी व बोरवटी येथेही नाभिक समाज भवन उभारायला मंजुरी पंधरा दिवसात देऊ अशी ग्वाही त्यांनी दिली. पुढे बोलताना ते म्हणाले की राजकारणात समाजकारणात आमची कायम भूमिका सत्याची न्यायाची असते लातूरच्या हिताची आम्ही नेहमी भूमिका घेत असतो लातूरची चौफेर भरभराट होत आहे हीच लातूरची संस्कृती आहे बारा बलुतेदारांना न्याय मिळाला पाहिजे ही काँग्रेस पक्षाची व नेत्यांची भूमिका आहे महायुती सरकारकडील आपले काम करण्यासाठी तळागाळातील लोकांना पैसे द्यावे लागतात महाराष्ट्रात सत्ता परिवर्तन करणे गरजेचे आहे. लोकसभेला महाविकास आघाडी राज्यात विक्रमी मताने जिंकली तसेच विधानसभेलाही महाविकास आघाडी राज्यात जिंकेल. महायुती सरकारला लोकसभे अगोदर लाडकी बहीण योजना आठवली नाही आमचा लाडकी बहीण योजनेला विरोध नाही सरकारला हातातून सत्ता जाईल याची भीती आहे म्हणून सुरक्षित बहीण असायला पाहिजे. लातूर शहरांमध्ये अनेक माता भगिनीवर अत्याचार झाले. येत्या विधानसभा जिल्हा परिषद पंचायत समिती महानगरपालिकेच्या निवडणुकीत नाभिक समाज व बारा बलुतेदारांना काँग्रेस पक्षाकडून संधी देण्यात येईल. नाभिक समाज कायम आमच्या पाठीशी उभा आहे नाभिक समाजाच्या सर्व मागण्या पूर्ण करून नाभिक समाजाला सर्वतोपरी मदत करू.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाराष्ट्र नाभिक महामंडळ लातूर जिल्हाध्यक्ष भाऊसाहेब शेंद्रे यांनी करून समाजाच्या कार्याची माहिती सविस्तर सांगितली माजी नगरसेवक अशोक गोविंदपूरकर, भटके विमुक्त संघटनेचे प्रदेश अध्यक्ष हरिभाऊ गायकवाड यांनी मनोगत व्यक्त केले तर या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक पद्माकर चिंचोले यांनी केले तर शेवटी आभार मनोज वाघमारे यांनी मानले.

# बालरंगभूमी परिषद देणार बालकांना हक्काचा रंगमंच: निलम शिर्के-सामंत



लातूर:– बालरंगभूमी परिषद लातूर शाखेच्यावतीने जल्लोष लोककलेचा या बालकांसाठीचा दोन दिवसीय लोककला महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. याचे उद्घाटन ३१ ऑगस्ट रोजी बालरंगभूमी परिषद मध्यवर्ती मुंबईच्या अध्यक्षा व सिने अभिनेत्री निलम शिर्के – सामंत यांच्या हस्ते झाले. दगडोजीराव देशमुख सभागृहात झालेल्या कार्यक्रमात जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर – घुगे, परिषदेचे महाराष्ट्राचे उपाध्यक्ष ॲड. शैलेश गोजमगुंडे, सहकार्यवाह असिफ अन्सारी, रंगकर्मी बाळकृष्ण धायगुडे, डॉ. दिपक वेदपाठक, संतोष कुलकर्णी, भारत थोरात आदी उपस्थित होते.

अलीकडेच महाराष्ट्राच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या निलम शिर्के याप्रसंगी बोलताना म्हणाल्या की, महाराष्ट्रातल्या नाट्य, नृत्य, संगीत, चित्र आदी कलाप्रकारात नैपुण्य मिळवणाऱ्या तसेच मिळवू इच्छिणाऱ्या बालकांना आपले कलागुण सिद्ध करण्यासाठी बालरंगभूमी महाराष्ट्रात हक्काचा मंच उपलब्ध करुन दिला जाईल. लातूरच्या बाल कलाकारांचे कलाविष्कार बघून त्यांनी इथल्या मुलांना रत्नागिरी येथील १०० व्या नाट्य संमेलनात संधी देणार असल्याचे सूतोवाच केले. तर जिल्हाधिकाऱ्यांनी बालकांचे कौतुक करताना सांगितले की, शिक्षण आणि संस्कृती संपन्न असलेल्या लातूरची मी जिल्हाधिकारी असल्याचा मला अभिमान वाटतो.

दोन दिवस चालणाऱ्या या महोत्सवात समूह लोकनृत्य, एकल लोकनृत्य, समूह लोकगीत, एकल लोकगीत एकल लोकवाद्य या पाच कलाप्रकारांचे सादरीकरण होणार असून यात लातूर जिल्ह्यातील ७५६ बालकलाकार सहभागी होत आहेत. कलाकारांना प्रोत्साहनपर पारितोषिके व सहभाग परमनप्र देण्यात येणार आहे.

हा महोत्सव यशस्वी होण्यासाठी बालरंगभूमी परिषद लातूर शाखेचे सुमती सोमवंशी, मयूर राजापूरे, हिरा वेदपाठक, सुवर्णा बुरांडे, प्रा. नवलाजी जाधव, रवी अघाव, रणजीत आचार्य, ड. बालाजी म्हेत्रे, वनिता गोजमगुंडे, सलीम पठाण, रविकिरण सावंत, महेश पवार, प्रिती ठाकूर, तन्मय रोडगे, विश्र्वजीत पांचाळ, विशाल वाटवडे, महेश बिडवे, ऋतुराज सुरवसे, आकाश कुलकर्णी, दुनगावे सर, अभिजीत भड, अभिषेक शिंदे आदी परिषदेचे पदाधिकारी व सदस्य मेहनत घेत आहेत.

# शिवलिंगेश्वर फार्मसीमध्ये हॅकाथॉन नवकल्पना स्पर्धा आणि डिझाइन थिंकींग कार्यशाळा संपन्न




औसा: (प्रतिनिधी) विद्याथ्र्यांच्या कल्पनाशक्तीला आणि नाविन्यपूर्णतेला वाव देणारी हॅकाथॉन– नवकल्पना स्पर्धा आणि डिझाइन थिंकींग दोन दिवसीय कार्यशाळचे आयोजन दि. ३० ते ३१ ऑगस्ट २०२४ दरम्यान शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसी, आलमला येथे करण्यात आले होती. या स्पर्धेच्या व कर्यशाळेच्या माध्यमातून नविन कल्पना, विचारसरणी, औषधनिर्माणशास्त्रात संशोधन व कौशल्य विकसित करण्यास विद्याथ्र्यांना मदत होणार आहे.

या स्पर्धेच्या उद्घाटनास महाविद्यालयाचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे, दगडोजीराव देशमुख डी. फार्मसी कॉलेजचे प्राचार्य डॉ. कैलास कापसे, प्रा. डॉ. समीर शफी, दिनेश गुजराथी, डॉ. अजय फुगटे, युवराज काटु, किरण रोडगे इत्यादी उपस्थित होते.

सामान्य माणसाच्या आयुष्यात बदल घडवतील असे मूलभूत विषयांवर तंत्रज्ञानाच्या मदतीने उपाय शोधण्याचे आव्हान, आधुनिक शिक्षण, आरोग्य यांमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने काय कल्पक उपाय निघू शकतात याचा शोध घेण्यास ही स्पर्धा व कार्यशाळा उपयुक्त ठरेल. अनोख्या कल्पनांमुळे हॅकाथॉन ही एक प्रेरणादायी स्पर्धा म्हणून ओळखली जाईल. हॅकाथॉन स्पर्धेत व कार्यशाळेतील सहभागींना एखाद्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यास आणि विविध प्रकारच्या नवकल्पनांबद्दल विचार करण्यास व त्या आलेल्या विचारांना आकर देण्यास मदत होणार आहे. तसेच लातूरसह प्रामुख्याने महाराष्ट्रातील विद्याथ्र्यांच्या कल्पकतेला व्यासपीठ उपलब्ध करून देण्यासाठी या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असल्याचे प्राचार्य विश्वेश्वर धाराशिवे यांनी सांगितले.

स्पर्धेसाठी विविध महाविद्यालयातील एकूण २१२ विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. स्पर्धेस मार्गदर्शक म्हणुन सोपान आघाव, संस्थापक अध्यक्ष,परीपुर्ण फुड्स तथा संचालक एनसीन फोरम आणि अंजोरी कुंभोजे, संचालीका, ओपेक्स ॲक्सीलीरेटर,प्रा.लि. हे उपस्थित होते. हॅकाथॉन स्पर्धेत प्रथम पारितोषिक प्राप्त शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीची अमिता बनसोडे, वैशाली काळेकर, वैभवी नरहरे, साक्षी माकणीकर, द्वितीय पारितोषिक प्राप्त गबाळे वैभव, मुलगीर आचल, उपासे नरसिंग, गिराम तुषार तर तृतीय पारितोषिक प्राप्त दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसीतील स्वामी सिद्धेश्वर, शिंदे प्रेमकुमार, सुरवसे स्वप्नील, गिराम नंदिनी आणि आयडीयाथॉन स्पर्धेतील प्रथम क्रमांक प्राप्त शिवलिंगेश्वर कॉलेज ऑफ फार्मसीतील खांडेकर जनार्दन, द्वितीय क्रमांक प्राप्त दयानंद इन्स्टीटयुट ऑफ फार्मसीतील ठोंबळे अभिषेक, खंदारकर वैष्णवी, सीमा महल्स, श्वेता कलानी तर तृतीय क्रमांक प्राप्त महाराष्ट्र कॉलेज ऑफ फार्मसी निलंगा येथील बिराजदार रामेश्वर, बोकरे अंगद, शेटे श्रृष्टी, अंतुरे गौरी या विजेत्यांना संस्थेचे सचिव बसवराज धाराशिवे, शिरीषप्पा उटगे व उपस्थित मान्यवर यांच्या शुभ हस्ते पारीतोषिक पद्रान करण्यात आले. या स्पर्धेचे व कार्यशाळेचे सुत्रसंचालन दिपक थोरमोट, उन्नती व्यास, वंसिका व अश्विनी कवाले या विद्याथ्र्यांनीनी केले. स्पर्धा व कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी बी. फार्मसी अंतिम वर्षातील विद्यार्थी, सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले.

# मुलींच्या मोफत शिक्षणाचा क्रांतीकारी निर्णय घेण्याचे काम महायुती सरकारने केले




लातूर / प्रतिनिधी– केंद्रातील मोदी सरकार व राज्यातील शिंदे–फडणवीस व अजित दादा पवार यांच्या सरकारने दहा वर्षामध्ये राज्याचा चेहरा मोहरा बदलण्याचे काम केलेले आहे. महिलांना मुख्यमंत्री लाडकी बहिण योजनेअंतर्गत दीड हजाराचा सन्मान निधी, महिलांना राजकीय क्षेत्रामध्ये ३३ टक्के आरक्षण, ५ लाखाचा आरोग्य विमा,निराधारांना दीड हजाराचे अनुदान अशा एक नव्हे तर अनेक योजना लागू करून महिलांना सन्मान वाढविण्याचे काम केंद्र व राज्य सरकारने केलेले आहे. त्यातच मुलींच्या शिक्षणासाठी लागणारा वाढता खर्च लक्षात घेऊन मुलींना उच्च शिक्षण मोफत देण्याचा निर्णय घेऊन मुलींना आवडीच्या क्षेत्रात करीअर करण्याची संधी शासनाने उपलब्ध करून दिलेली आहे. त्यामुळे खर्या अर्थाने मुलींच्या मोफत शिक्षणाचा क्रांतीकारी निर्णय घेण्याचे काम महायुती सरकारने केलेले आहे असे प्रतिपादन भाजपा नेते तथा किसान मोर्चा गोवा व गुजरात राज्याचे प्रभारी माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी केले.

यावेळी ते लातूर तालुक्यातील मौजे सारसा व कासारजवळा येथे परिवर्तन संकल्पयात्रेच्या निमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. यावेळी सारसा येथील कार्यक्रमाला भाजपा युवा मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सूर्यकांतराव शेळके, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस निळकंठराव पवार, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब देशमुख, अंबा सहकारी साखर कारखान्याचे संचालक शिवराम कदम, अप्पासाहेब पाटील, बब्रूवान पवार, सारसा गावचे सरपंच हणमंत भिसे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष रावसाहेब भिसे, जाजू शेठ, उध्दवराव जाधव, महादेव कदम, महादेव गायकवाड, श्रीकांत तांबारे, रामकृष्ण आडसूळ, सुभाष पवार, श्रीधर पवार, गणपत तांबारे, सुभाष पवार, अख्तर पठाण, संतोष भिसे, भारत पवार, संतराम भिसे, अरूण लांडगे, अशोक आडसूळ आदी उपस्थित होते तर कासाजवळा येथील कार्यक्रमाला मंजूरखाँ पठाण, श्रीमंत यादव, नामदेव बडगिरे, विष्णूपंत यादव, राजेसाहेब देशमुख, रघुनाथ पाटील, सुनिल पाटील, दस्तगीर पठाण, दुर्गाप्पा चव्हाण,सागर घोडके, उत्तम पाटील, बापूराव कवाडे आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी पुढे बोलताना माजी आ.कव्हेकर म्हणाले की, देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी १४० कोटी जनतेच्या आशीर्वादावर तिसर्यांदा प्रधानमंत्री पदाची शपथ घेऊन भारतीय राज्यघटनेचा सन्मान करण्याचे काम केले. परंतु खरा राज्यघटनेला धोका काँग्रेसने देण्याचे काम केलेले आहे. १९७५ मध्ये इंदिरा गांधीनी आणिबाणी जाहीर करून अनेकांना अटक करण्याचे काम केलेले आहे. यामध्ये जयप्रकाशजी नारायण यांच्यासारख्या राष्ट्रीय नेत्याला व लातूर जिल्ह्यातील ॲड.गोमारे, धनंजय पाटील व कुकडे काका यांनाही अटक झाली होती. यानंतरही कोरोना काळातील परिस्थितीवर हिंमतीने मात करीत भारत देशाची चौफेर प्रगती करण्याचे काम देशाचे पंतप्रधान मोदीजींनी केलेले आहे. त्यामुळे जगातील १४ राष्ट्रांनी मोदीजींना सर्वोच्च पुरस्कार देऊन गौरविले. त्यामध्ये सहा मुस्लीम राष्ट्रांचाही समावेश आहे. आताही जगातील ७८ टक्के लोक मोदीजींना पसंती देत आहेत. त्यामुळे त्यांच्या हातून होत असलेल्या प्रगतीमुळे अठराव्या शतकात स्वामी विवेकानंदांनी केलेली भविष्यवाणी खरी ठरून २०३१ मध्ये भारत जगाचे नेतृत्व करेल. असा विश्वासही माजी आ.शिवाजीराव पाटील कव्हेकर यांनी व्यक्त केला.

यावेळी कार्यक्रमाचे सुत्रसंचालन व आभार नवनाथ झुटे यांनी मानले. यावेळी या कार्यक्रमाला भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**विकासाच्या प्रवाहात राहण्यासाठी मोदीजींच्या पाठीशी सक्षमपणे उभे रहा**

**– अजित पाटील कव्हेकर**

या परिवर्तन संकल्प यात्रेच्या माध्यमातून गावोगावी रस्ते, कचरा व पाणी हे प्रश्न समोर येत आहे. गेल्या ४० वर्षापासून लातूरातील सत्ताधारी देशमुखांवर विश्वास ठेवून आपण त्यांना निवडून दिले, परंतु त्यांनी मात्र विकासाची कामे तर लांबच परंतु साधी भेट घेण्याचेही सौजन्य त्यांनी दाखविलेले नाही. त्यातूनही एखाद्या कार्यकर्त्यांनी काही प्रश्न घेऊन त्यांच्या समोर मांडण्याचा प्रयत्न केला तर त्याला दाबण्याचे काम लातूरातील सत्ताधार्याकडून केले जाते. परंतु भाजपा नेते तथा माजी आ.कव्हेकर साहेब मात्र २००४ पासून कुठलेही पद व सत्ता नसताना सर्वसामान्य जनतेच्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम करीत असतात हे सर्वांनाच माहीत आहे आणि आता मी ही तुमचे प्रश्न जाणून घेऊन त्या प्रश्नाला न्याय देण्याचे काम करीत आहे. त्यामुळे या पुढील कालावधीत तरी तुमचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी भारतीय जनता पार्टीच्या पाठीशी राहून विकासाच्या प्रवाहात या असे आवाहन भाजपा युवा मार्चाचे प्रदेश उपाध्यक्ष अजितसिंह पाटील कव्हेकर यांनी केले.

# विधानसभा जिंकण्यासाठी कार्यकर्त्यानो स्वयंप्रकाशित व्हा

औसा – लोकसभा निवडणुकीत दगाफटका झाला याला अधिक जिव्हारी न घेता कार्यकर्त्यांनी गावा गावातील लोकांना एकत्रित करून त्याचे परिवर्तन मतपेटीपर्यंत पोहचविण्याची जबाबदारी आतापासूनच घेतली पाहिजे पराभव विजयाचे पर्व असते ते विधानसभा जिंकून दाखविण्यासाठी कार्यकर्त्यांने स्वयंप्रकाशित होवून विधानसभा जिंकणारच असा निर्धार करून कामाला लागावे असे आवाहन माजीमंत्री रावसाहेब दानवे यांनी उपस्थित कार्यकर्त्यांना केले आहे.




औसा येथील विजय मंगल कार्यालयात (दि.३१) रोजी औसा विधानसभा भारतीय जनता पक्षाचे अधिवेशन पार पडले या अधिवेशनाला प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी केंद्रीय राज्यमंत्री रावसाहेब दानवे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मंचावर आमदार अभिमन्यू पवार, माजी आमदार गोविंद केंद्रे, जिल्हा प्रभारी संतोषअप्पा मुक्ता, तालुकाध्यक्ष सुभाष जाधव, औसा शहर अध्यक्ष सुनिल उटगे, कासारसिरसी मंडळाचे अध्यक्ष ज्ञानेश्र्वर वाकडे, जिल्हा उपाध्यक्ष किरण उटगे,सभापती चंद्रशेखर सोनवणे,उपसभापती प्रा भिमाशंकर राचट्टे, संगायो समितीचे तालुकाध्यक्ष काकासाहेब मोरे,रोहयो समितीचे अध्यक्ष सदाशिव जोगदंड, गोकर्णा मोरे कल्पना डांगे, कल्पना ढविले, कविता गोरे, भाग्यश्री यादव आदीसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. याप्रसंगी माजीमंत्री रावसाहेब दानवे पुढे बोलत होते की आ अभिमन्यू पवार यांनी या पाच वर्षांत मतदारसंघात मोठ्या प्रमाणात विकासकामे केली असून पुन्हा महाराष्ट्राच्या विधानसभेत ते मोठ्या मताधिक्याने विजयी होवून गेले पाहिजेत या सरकारने विकास योजनेचा अक्षरशा पाऊस पाडला असून सरकारने केलेल्या कामाची माहिती मतदारापर्यंत पोहचविण्याचे काम कार्यकर्त्यांने केले पाहिजे. विकासासोबत पक्ष संघटन महत्त्वाचे आहे. त्यामुळे कार्यकर्त्यांनी सर्वसामान्य लोकांमध्ये मिसळून त्यांच्या अडचणी जाणून घेत त्या सोडविण्यासाठी काम करावे. असे आवाहन यावेळी बोलताना त्यांनी केले. याप्रसंगी अनेक ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आले. तसेच काही नूतन पदाधिकाऱ्यांना निवडीचे पत्र माजीमंत्री दानवे यांच्या हस्ते देण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांशी संवाद साधताना आ अभिमन्यू पवार यांनी सोशल समाज माध्यमातून पुर्ण ताकदीने आपली बाजू मांडली पाहिजे कार्यकर्त्यांनी समाज माध्यमातून व्यक्त होणे आवश्यक असल्याचे सांगून विधानसभा निवडणुकीत भारतीय जनता पक्षाचा विजय होणार हे ठासून सांगितले पाहिजे. औसा विधानसभा मतदारसंघाच्या विकासासाठी आपण कुठेही कमी पडलो नसून येणाऱ्या काळातही अनेक विकासकामे पूर्ण केली जातील असे ते म्हणाले.याप्रसंगी अनेकाने आपले मनोगत व्यक्त केले.

# काँग्रेस पक्षाने जाहीरनामा पूर्तीसाठी कायमच प्राधान्य दिले - पृथ्वीराज चव्हाण

मुंबई,३१ – काँग्रेस पक्ष जे मुद्दे जाहीरनाम्यात घेते ते मुद्दे सरकार आल्यावर पूर्ण करण्याला प्राधान्य असते. याचा अनुभव ज्या ज्या राज्यात काँग्रेसचे सरकार आले आहे तेथील जनतेने घेतला आहेत. टिळक भवन येथे जाहीरनामा समितीने राज्यातील प्रमुख सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधी सोबत संवाद साधून जाहीरनाम्यातील जनतेच्या मुद्द्यावर चर्चा केली. हि मिटिंग जाहीरनामा समितीचे अध्यक्ष माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली व माजी खासदार भालचंद्र मुणगेकर, माजी मंत्री सुरेश शेट्टी यांच्या उपस्थितीत पार पडली. जाहीरनामा समितीत विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मंत्री नितीन राऊत हे देखील सदस्य आहेत.

यावेळी माजी मुख्यमंत्री आ पृथ्वीराज चव्हाण म्हणाले कि, काँग्रेस पक्षाची जाहीरनामा समिती हि महत्वाची समिती मानली जाते. जाहीरनामा समितीमधील आश्वासने पूर्ण करण्याला काँग्रेस पक्ष कायमच प्राधान्य देत असते. त्यामुळेच काँग्रेस हे जनतेचा विचार करणारे सरकार अशी ओळख निर्माण झाली आहे. काँग्रेसने सरकार असताना अनेक धोरणात्मक निर्णय घेतले आहेत. ज्याचा फायदा आजही जनतेला होत आहे. मनमोहन सिंह यांच्या नेतृत्वात यु पी ए चे सरकार असताना प्रणव मुखर्जी यांच्या अध्यक्षतेखाली मंर्त्याची कमिटी केली होती. जी जाहीरनामा पूर्ण करण्याबाबत धोरण राबवत असे. काँग्रेसने तेलंगणा, कर्नाटक या राज्यात जी आश्वासने जाहीरनाम्यात दिली होती ती पूर्ण करण्यावर काँग्रेस सरकारने प्राधान्य देत पूर्ण करीत आहे. हा फरक काँग्रेस सरकारचा व इतर पक्षांच्या सरकारचा आहे.

जाहीरनामा समिती राज्यात विभागवार मिटिंग घेऊन त्या त्या भागातील नागरिकांशी व सामाजिक संस्थांशी संवाद साधणार आहे. येत्या काही दिवसात समितीची मिटिंग पुणे व नागपूर येथे होणार असल्याची माहिती यावेळी पृथ्वीराज चव्हाण यांनी दिली. या बैठकीला माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, माजी खासदार डॉ. भालचंद्र मुणगेकर, माजी मंत्री सुरेश शेट्टी, प्रदेश उपाध्यक्ष प्रतिभा शिंदे, महात्मा गांधी यांचे पणतू तुषार गांधी, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते उल्का महाजन, फिरोज मिठीबोरवाला, प्रदेश सरचिटणीस राजेश शर्मा, श्रीरंग बरगे यांच्यासह विविध सामाजिक संघटनांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

हे पत्र मालक, मुद्रक व प्रकाशक **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** यांनी मे. यशवंत प्रिंटींग प्रेस, ५१, एमआयडीसी, लातूर येथे छापून दैनिक यशवंत कार्यालय, गांधी मार्केट, लातूर येथे प्रसिध्द केले. शहर कार्यालय–गांधी मैदान, लातूर,दूरध्वनी–२४६९४६, मुख्य कार्यालय –५१, एमआयडीसी, लातूर, दूरध्वनी–२२०२४६,फॅक्स(०२३८२)२२०१४१, उस्मानाबाद कार्यालय दूरध्वनी–(०२४७२)२२८९१२, सोनवणे : ९४०२९ ४९६०७ परभणी कार्यालय – दूरध्वनी – २२१४५३, उदगीर कार्यालय–(०२३८५) २५३९९८.राम मोतीपवळे : ८५०२२८२४० (अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील विचाराशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
संस्थापक संपादक–**प्रा.बी.व्ही.मोतीपवळे**, संपादक – **डॉ. ओमप्रकाश मोतीपवळे** ईमेल : dailyyashwant@gmail.com, omj7@rediffmail.com

# रेशनवरील मोफत तांदूळ आता होणार कायमचा बंद

नवी दिल्ली, (पीएसआय)- केंद्र सरकार देशातील गरजूंना रेशनकार्डद्वारे मोफत रेशन देते. यामध्ये शिधापत्रिकाधारकांना मोफत तांदूळ दिला जातो, मात्र त्यात मोठा बदल करण्याचा निर्णय केंद्र सरकारने घेतला आहे. मोफत तांदूळ देण्याऐवजी आता इतर ९ वस्तू देण्याचा निर्णय सरकारने घेतला आहे.

केंद्र सरकारकडून देशातील नागरिकांसाठी अनेक योजना राबवल्या जातात. यातील बहुतांश योजना गरीब आणि गरजू लोकांसाठी आहेत. रेशन कार्डधारकांना मोफत रेशन योजनेंतर्गत रेशनही पुरविले जाते. मोफत रेशन योजनेअंतर्गत जवळपास ९० कोटी लोकांना मोफत रेशन दिले जाते. यामध्ये लोकांना पूर्वी मोफत तांदूळ दिला जात होता. मात्र आता यात बदल करण्यात आला आहे. त्यानुसार रेशनवरील मोफत तांदूळ बंद करण्यात येणार आहे. त्याऐवजी इतर ९ जीवनावश्यक वस्तू मिळणार आहेत. यामध्ये गहू, डाळी, हरभरा, साखर, मीठ, मोहरीचे तेल, मैदा, सोयाबीन आणि मसाले यांचा समावेश आहे. लोकांचे आरोग्य सुधारण्यासाठी आणि त्यांच्या आहारातील पोषणाची पातळी वाढविण्यासाठी सरकारने हा निर्णय घेतला आहे. यामुळे लोकांचे जीवनमानही सुधारेल, अशी सरकारला आशा आहे.

शिधापत्रिकेसाठी अर्ज कसा करावा

तुमच्याकडे अद्याप शिधापत्रिका नसेल, परंतु तुम्ही त्यासाठी पात्र असाल, तर तुम्ही ते जारी करण्यासाठी अर्ज करू शकता. यासाठी तुम्हाला तुमच्या जवळच्या अन्न व पुरवठा विभागाच्या कार्यालयात जावे लागेल. तुम्ही या विभागाच्या अधिकृत वेबसाइटवरून अर्ज डाउनलोड करू शकता. अर्ज भरताना, सर्व आवश्यक माहिती बरोबर असल्याची खात्री करा. फॉर्ममध्ये मागितलेली संबंधित कागदपत्रेही तुम्हाला जोडावी लागतील. तुमचा फॉर्म आणि कागदपत्रे तयार झाल्यानंतर, तुमच्या जवळच्या रेशनिंग कार्यालयात जमा करा.

# धनगर समाजाचा पुन्हा एल्गार; ना नेता ना पक्ष; धनगर आरक्षण एकच लक्ष

सोलापूर, - धनगर समाजाने आरक्षणाच्या मागणीसाठी पुन्हा आंदोलन पुकारले आहे. ९ सप्टेंबरपासून पंढरपूर येथे राज्यस्तरीय बेमुदत उपोषण सुरू होणार आहे. सकल धनगर समाज संघटनेचे समन्वयक अमोल कारंडे यांनी ही घोषणा केली आहे. ''ना नेता ना पक्ष; धनगर आरक्षण एकच लक्ष'' या घोषवाक्यासह आंदोलनाला सुरुवात होईल.

आंदोलनाची तयारी म्हणून १ सप्टेंबर रोजी जेजुरीत मल्हारी मार्तंड खंडेरायाच्या दर्शनानंतर धनगर बांधव पंढरपूरकडे मार्गस्थ होतील. पंढरपूरच्या छत्रपती शिवाजी महाराज चौकात हे उपोषण सुरू होईल. धनगर समाजाच्या प्रमुख मागण्यांमध्ये त्यांना अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात आरक्षण मिळावे, ही प्रमुख मागणी आहे.

सध्या, धनगर समाज ओबीसी (इतर मागासवर्गीय) प्रवर्गात आरक्षित आहे, परंतु त्यांना एसटी प्रवर्गात समाविष्ट करावे, अशी त्यांची दीर्घकालीन मागणी आहे. यासाठी त्यांनी राज्यभरात आंदोलन केले आहे. कारंडे यांनी राज्यातील प्रमुख राजकीय पक्षांवर धनगर आरक्षणाच्या मुद्द्यावर निष्क्रियता दाखवल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे आता सर्व धनगर समाज एकत्र येऊन सामूहिक नेतृत्वाखाली हे उपोषण करणार आहे.

या आंदोलनाच्या माध्यमातून सरकारवर दबाव आणण्याचा आणि धनगर समाजाच्या मागण्या मान्य करून घेण्याचा त्यांचा उद्देश आहे. उपोषण सुरू होण्यापूर्वी जेजुरीत भंडारा उधळून, खंडेरायाचे दर्शन घेतले जाईल. धनगर समाजाचे हे आंदोलन राज्यभरातील राजकारणात एक महत्त्वाचा मुद्दा ठरण्याची शक्यता आहे.

# 'नॅशनल हायड्रोइलेक्ट्रीक पावर लिमिटेड'ला नवरत्न' कंपनीचा दर्जा बहाल

दिल्ली,३१ - भारत सरकारने नॅशनल हायड्रोइलेक्ट्रीक पावर लिमिटेड' - एनएचपीसीला 'नवरत्न' कंपनीचा प्रतिष्ठित दर्जा बहाल केला आहे. वित्त मंत्रालयाच्या सार्वजनिक उपक्रम विभागाने ३०-०८-२०२४ रोजीच्या आदेशानुसार, एनएचपीसीला ही 'नवरत्न कंपनी' म्हणून घोषित करण्यात आली आहे, ज्यामुळे एनएचपीसीला परिचालन आणि आर्थिक बाबींसाठी आणखी स्वायत्तता मिळेल.


एनएचपीसीचे मुख्य व्यवस्थापकीय संचालक श्री. आर. के. चौधरी, म्हणाले, ''हा एनएचपीसीच्या कुटुंबासाठी खरोखरच एक ऐतिहासिक क्षण आहे, आणि आमच्या उल्लेखनीय आर्थिक आणि परिचालन कामगिरीची ही ओळख आहे.'' भारत सरकारने एनएचपीसीला नवरत्न दर्जा बहाल केल्याबद्दल तसेच एनएचपीसीवर मंत्रालयाने दाखवलेल्या अतूट विश्वासाबद्दल आणि पाठिंब्याबद्दल एनएचपीसी उद्योगाच्या वतीने त्यांनी ऊर्जा मंत्रालयाचे आभार मानले. चौधरी म्हणाले की, ''एनएचपीसी भारतीय ऊर्जा क्षेत्रात महत्त्वाची भूमिका निभावत असून देशाच्या जलविद्युत क्षमतेचा उपयोग करण्यातही ठोस भूमिका बजावत आहे. पवन आणि सौर ऊर्जा पर्यायांमध्येही आम्ही विविधता आणली असून, आम्ही एक संपूर्ण हरित ऊर्जा कंपनी आहोत, असेही त्यांनी यावेळी अधोरेखित केले.

नवरत्न दर्जा बहाल केल्याने एनएचपीसीला अनेक महत्त्वाचे लाभ मिळाले आहेत. यामुळे एनएचपीसीला जलद निर्णय घेणे? सहजशक्य होईल, कार्यक्षमता वाढेल आणि कर्मचारी अधिक सक्षम होतील. तसेच हे प्रमुख कॅपेक्स (एअर्इ्रं) आणि गुंतवणूक योजनांसाठी सहायक ठरेल, विकासाला चालना मिळेल, बाजारपेठेचा विस्तार होईल तसेच यामुळे दीर्घकालीन नफ्यात वृध्दी होईल. एनएचपीसीला संयुक्त उपक्रम राबविण्यास आणि परदेशात कार्यालये स्थापन करण्यासाठी, नवीन बाजारपेठांमध्ये प्रवेश करण्यास आणि स्थानिक कौशल्याचा लाभ घेण्यास जास्त अधिकार मिळतील. याशिवाय, एनएचपीसीला तंत्रज्ञानात आघाडी घेऊन आणि बाजारपेठेतील स्थिती मजबूत करून नावीन्यपूर्णतेला प्रोत्साहन देता येईल. यामुळे विलीनीकरण आणि अधिग्रहण प्रक्रिया सुद्धा सुलभ होतील ज्यामुळे विकासाच्या दिशेने वाटचाल करतानाच बाजारपेठेतील हिस्साही वाढेल.

सध्या, एनएचपीसीची एकूण स्थापित क्षमता ७१४४.२० मेगावॅट (शें) आहे आणि कंपनी सध्या एकूण १०४४२.७० शें प्रकल्पांच्या बांधकामात गुंतलेली आहे. यामध्ये २००० शें सुबनसिरी निम्न प्रकल्प (आसामअरुणाचल प्रदेश) आणि २८८० शें दिबांग बहुउद्देशीय प्रकल्प (अरुणाचल प्रदेश) यांचा समावेश आहे. सध्या एनएचपीसी ५०००० शें पेक्षा जास्त क्षमतेच्या प्रकल्पांवर काम करत आहे, जे विकासाच्या विविध टप्प्यांत आहेत. २०३२ सालापर्यंत एनएचपीसी २३००० मेगावॅट आणि २०४७ सालापर्यंत ५०००० मेगावॅटची स्थापित क्षमता साध्य करण्याच्या दृष्टीने सातत्याने काम करत आहे.

# व्यायामाचेही व्यसन नको

शरीर तंदुरूस्त राहण्यासाठी आणि मन मजबूत राहण्यासाठी व्यायाम करणे आवश्यकच आहे. व्यायामाच्या गरजेबाबत कोणाचेच दुमत होणार नाही. परंतु काही मानसशास्त्रज्ञ व्यायामाच्या बाबतीत एक इशारा देत आहेत की व्यायाम करा पण व्यायामाचे व्यसन लावून घेऊ नका. व्यायामाच्या अनावश्यक आहारी जावू नका. दारू पिणारा माणूस जसा ऍडिक्ट होण्याची शक्यता असते तसेच व्यायाम करणाराही व्यायामाच्या बाबतीत ऍडिक्ट होण्याची भिती असते आणि म्हणून आपण व्यायाम करत आहोत की नाही हे तर पहाच पण आपण व्यायामाच्या बाबतीत व्यसन लावून घेत आहोत की काय यावरही लक्ष ठेवा, असे मानसशास्त्रज्ञांचे म्हणणे आहे. शरीर तंदुरूस्त असले पाहिजेच परंतु आपल्या दिवसातले सारे रुटीन केवळ त्यासाठीच्या व्यायामाच्या भोवती गुंफले जात असेल तर हा धोका संभवतो.



जेव्हा आपण व्यायाम करतो तेव्हा शरीरातून एन्डॉर्फिन आणि सेरेटोनिन ही दोन द्रव्ये पाझरत असतात. त्यांचा उपयोग आपल्याला होत असतो. एन्डॉर्फिनमुळे मानसिक डिप्रेशन कमी होते तर सेरेटोनिनमुळे मनावरचा ताण कमी होतो. मात्र आपण या स्थितीच्या आहारी गेलो तर आपल्या स्नायूंमध्ये काही दोष निर्माण होण्याची शक्यता असते. एवढेच नव्हे तर व्यायाम केल्याशिवाय पर्यायच नाही अशी स्थिती निर्माण होऊन एखादादिवस व्यायाम बुडत असेल तर त्या दिवशीच्या त्या भावनेपोटी काही शारीरिक कटकटीही निर्माण होत असतात. तेव्हा एखादादिवस व्यायाम केला नाही तर फार मोठे नुकसान होईल ही भावना मनातून काढली पाहिजे. व्यायामातून निर्माण होणारी शरीराची तंदुरूस्ती ही स्वागतार्हच असते. परंतु आपल्या आयुष्याला परिपूर्णता येण्यासाठी एवढी एकच गोष्ट आवश्यक नाही.व्यायामसुध्दा मोजकाच आणि नेमकाच करावा. परंतु काही लोकांच्या मनामध्ये असा गैरसमज असतो की जितका जास्त वेळ व्यायाम तेवढे आरोग्य उत्तम. वास्तविक हा गैरसमज आहे. शरीरसुध्दा एका विशिष्ट मर्यादेपर्यंतच तंदुरूस्त होत असते. त्या मर्यादेपर्यंत शरीर मजबूत होण्यासाठी जेवढा व्यायाम आवश्यक आहे तेवढाच व्यायाम केला पाहिजे. उगाच फार मोठी बॉडीबिल्डिंग होईल म्हणून अधिकाधिक जीममध्ये काढायला लागलो तर त्याचा फायदा तर होत नाहीच पण जीममधला तो अनावश्यक वेळ वाया जातो. ज्याचा इतर कामांवर विपरित परिणाम होण्याची शक्यता असते.

# हर्बल टीच्या अतिरेकाने जडू शकतात अनेक व्याधी

अलिकडे हर्बल टीकडे जिम करणारे शिवाय डायटिंग करणारे, तसेच ज्यांनी चहा सोडला अशा व्यक्ती वळलेल्या आहेत. पण वाटते तेवढी हर्बल टी सुरक्षित नाही. हर्बल टीचा अतिरेक हा तुमच्या आरोग्याला घातक ठरू शकतो. हर्बल टी दिवसांतून एक दोनदा घेतल्याने त्याचा शरीरावर परिणाम होत नाही. पण जर दिवसभरात आपण पाच कपांपेक्षा जास्त 'ग्रीन टी'चे सेवन करत असाल तर ते मात्र तुमच्या आरोग्यास धोकादायक ठरू शकते.

अनेक व्याधी हर्बल टीच्या अतिसेवनाने होऊ शकतात. यात तीव्र डोकेदुखी, घाबरल्यासारखे होणे, निद्रानाशाची समस्या, उलटी, डायरिया, चिडचिडेपणा, हृदयाचे ठोके जलदगतीने पडणे, हातापायात कंप, हार्ट बर्न, चक्कर येणे, कानांमध्ये आवाज येणे आदी लक्षण जाणवतात.

हर्बल टी सोबतच ग्रीन टी मध्ये घातक ठरू शकते. 'ग्रीन टी'मधील टेनन नामक रसायनामुळे पोटातील अँसिडची मात्रा वाढते. टेननंमुळे बद्धकोष्ठता, पोटदुखी, मळमळ संभवते. म्हणूनच जपान आणि चीनमध्ये जेवण झाल्यानंतर अथवा जेवणाच्या मध्ये 'ग्रीन टी' घेतला जातो. पेप्टक अल्सरची समस्या असल्यास तुम्ही 'ग्रीन टी' घेण योग्य नाही. 'ग्रीन टी'मधील रसायने गर्भावस्थेत घातक ठरू शकतात. त्याचप्रमाणे स्तनपान देणार्?या महिलांनाही 'ग्रीन टी'चा दुष्परिणाम संभवतो. दोन कप 'ग्रीन टी'मध्ये २०० ग्रॅम कॅफन असते. म्हणूनच या महिलांनी दिवसातून दोन कपापेक्षा अधिक 'ग्रीन टी' घेऊ नये. यामुळे गर्भपाताचा धोका संभवतो.

## गुरू वचन

### नशिबात असेल तेच मिळेल

एका गावात सोमिलक नावाचा कष्टाळू कोष्टी होता. तो तलम कापड विणण्यात पटाईत होता. पण कष्ट भरपूर करूनसुद्धा अपेक्षित मोबदला त्याच्या हाती येत नव्हता. त्याच्या बरोबरचे इतर कोष्टी जाडंभरडं कापड विणूनसुद्धा भरपूर पैसा कमवित होते.

सोमिलकाने दुसर्‍या गावी जाऊन धंदा करण्याचे ठरविले. पण सोमिलकाची बायको त्याला म्हणाली, ''कशाला उगाच दुसर्‍या गावात जाता.... आपल्या नशिबात भरपूर पैसा मिळणार असेल तर याच ठिकाणी कापड विणून मिळेल. पण नशिबात जर नसेल तर दुसर्‍या गावी जाऊनही उपयोग काय?'' तरी हट्टाने सोमिलक दुसर्‍या गावी जातो. भरपूर कष्ट करतो आणि तिनशे मोहरा कमावतो.

त्या मोहरा घेऊन आपल्या गावी येण्यास निघतो. दमल्यामुळे एका झाडाखाली विश्रांती घेता घेता त्याला झोप लागते. थोड्यावेळाने दोन माणसांच्या संभाषणाच्या आवाजामुळे झोप उडते. त्या दोघांचे संभाषण सोमिलक ऐकतो.

''अरे, कर्त्या... सोमिलकाने आता तीनशे मोहरा कमावल्या पण त्याच्या नशिबात फक्त अन्नवस्त्रापुरताच पैसा आहे'' कर्म विचारतो. त्याबरोबर कर्ता उद्गारतो, ''त्याने कष्ट केले त्याचे फळ मी दिले. ते फळ त्याच्याकडे ठेवायचे की नाही हे तुझं काम!''दे घोघेजण सोमिलकाचे कर्म आणि कर्ता असतात. सोमिलक पूर्ण जागा होऊन आपली मोहरांची पिशवी बघतो तर ती रिकामी असते!

# १ सप्टेंबरला जन्मलेल्या लोकांचा भविष्य

स्वभाव : तुमच्या जन्मतारखेवर चंद्र, गुरू व बुध यांचा प्रभाव आहे. ज्ञान मिळवण्यात, माहिती जमा करण्यात तुम्हाला रस आहे. तुमचे वाचन व व्यासंग अफाट असतात. अनेक विषयात तुमची तल्लख बुध्दी स्वैर संचार करते. आपल्या बुध्दीला एखादी गोष्ट पटल्याशिवाय तुम्ही तिचा स्विकार करीत नाही. सर्वांबल तुम्हाला मनापासून माया, प्रेम, आपुलकी वाटते. इतरांच्या दु:खाशी तुम्ही तात्काळ समरस होता. शारीरिक उपभोगांपेक्षा काव्य, शास्त्र विनोदाचा बौध्दिक आनंद घेण्याकडे तुमचा कल असतो.

जीवनात बुध्दीइतकेच भावनांनाही महत्व आहे. हे लक्ष्यात घ्या. अनेक विषयांचा अभ्यास करतांना निदान एका विषयात प्राविण्य मिळवण्याचा प्रयत्न करा. जास्त बौध्दिक श्रमांचा ताण मेंदूवर, मज्जासंस्थेर पडू देऊ नका. आहारात 'बी' जीवनसत्व अवश्य ठेवा.

कार्यक्षेत्र : अचूक शब्दयोजना हे तुमचे वैशिष्ट्य असल्याने जाहिरात क्षेत्रात तुम्ही चांगली छाप पाडू शकाल. वाड्.मय पुस्तक लेखन, पत्रकारिता यातही आपला ठसा उमटवू शकाल. हिशोब ठेवण्याचे व ताळेंबद मांडण्याचे कसब अंगी असल्याने हिशोबतपासनीस, करसल्लागार म्हणून नोकरी वा स्वतंत्र व्यवसाय करू शकाल. बँका, वित्तीय महामंडळे, टेलिफोन, दूरसंचार ही क्षेत्रेही अनुकूल ठरतील.

प्रणयी जीवन : जोडीदाराचा विचार करतांना त्याचे वाचन, व्यासंग, स्वतंत्र विचार करण्याची क्षमता याला तुम्ही महत्व देता. एका विशिष्ट बौध्दिक पातळीची तुम्ही त्याच्याकडून अपेक्षा करता. भावनावश होणार्‍या किंवा शरीरसुखाच्या पाठीमागे धावणार्‍या व्यक्ती तुम्हाला आवडत नाहीत. तुम्हाला अनुरूप जोडीदार ऑगस्ट २२ ते सप्टेंबर २२ दरम्यानच्या व्यक्तीत मिळेल.

वर्षफळ : कार्यालयीन धोरणाच्या आखणीत वरिष्ठ तुमचा सल्ला घेतील. उच्च शिक्षण वा प्रशिक्षणाची संधी येईल. फेब्रुवारी मार्च मध्ये मंगलकार्याच्या बैठकीसाठी पुढाकार घ्याल. एप्रिल मे मध्ये वडिलधार्‍या माणसांच्या प्रकृतीला जपा. जून जुलै मध्ये कार्यालयात कार्यक्षमतेबल कौतुक होईल. ग्रंथखरेदी, फर्निचर यासाठी खर्च होईल. नोव्हेंबर डिसेंबर मध्ये जुन्या मित्रांच्या ओळखीतून लाभ होतील. महत्वाचे वर्ष : ५, १४, २३, ३२, ४१, ५०, ५९, ६८. भाग्यरत्न : पाचू याच तारेखेची व्यक्ती : राम कोलारकर, राज बब्बर, डेव्हिड हॉटन, रामनरेश सरवण

# राशी भविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: उत्तर
नोकरीत कोणतीही अपेक्षा करण्यापूर्वी तुमच्यातील पात्रतेचा विचार करा. थोरामोठ्यांचा आदर करा.

**वृषभ:** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:दक्षिण
ज्या गोष्टी तुम्हाला पसंत नाहीत त्या करायला लागल्यामुळे तुमची थोडीशी चीडचीड होईल.

**मिथुन:** शुभ रंग:काळा, शुभ दिशा:पश्चिम
स्वत:ची तब्येत सर्व पथ्यपाणी पाळून व वेळचे वेळी वैद्यकीय उपाय करून ठणठणीत ठेवणे हे आपले आद्यकर्तव्य ठरेल.

**कर्क :** शुभ रंग:पिवळा, शुभ दिशा: उत्तर
घरगुती जबाबदारी पूर्ण सावधतेने पार पाडावी लागेल. आर्थिक उलाढाली मानासरख्या करता येतील.

**सिंह :** शुभ रंग :निळा, शुभ दिशा: दक्षिण
नवे मोठे व्यवहार न केलेले बरे. अति उत्साहात काही चुका घडणे शक्य. युवकांनी वाहने चालविताना काळजी घ्यावी.

**कन्या:** शुभ रंग: लाल, शुभ दिशा:उत्तर
कामाच्या ठिकाणी मनातील विचार कृतीतून किंवा बोलण्यातून व्यक्त करण्याची संधी मिळेल.

**तुळ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा:दक्षिण
व्यवसायधंद्यात तुमचे अंदाज अचूक ठरतील. बदलीच्या प्रयत्नांना वेग द्या. महत्त्वाची कामे पुढे ढकला.

**वृश्चिक :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम
कामच्या ठिकाणी अतिरिक्त ताणामुळे तब्येतीवर परिणाम होणे शक्य. योग्य वेळी तज्ज्ञांचा सल्ला अवश्य घ्या.

**धनु:** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:पश्चिम
सरकारी देणी चुकवू नका. वरिष्ठांना दुखवू नका. नियमबाह्य व्यवहार करू नका. कोणालाही दुखवू नका.

**मकर :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:पश्चिम
महत्त्वाची कागदपत्रे, व्यावसायिक गुपिते, मौल्यवान वस्तू आणि रोकड यांना अनाठायी बाहेरची वाट मिळणार नाही हे पहा.


**कुंभ:** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा: पश्चिम
नोकरी-व्यवसायातील वाटचाल सुखाची होण्यासाठी कोणाशी वाद होणार नाही याची काळजी घ्या.

**मीन :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा: उत्तर
सरकारी नोकरदारांनी कोणतीही बेकायदेशीर वाट न चाललेली बरी. तरुण-तरुणीने कोणतेही निर्णय घाईने घेऊ नये.

## उपदेशकथा

### निर्भय

भावाची प्रकृती बिघडल्याचा निरोप गणपतला मिळाला तेव्हा तिन्हीसांजा उलटून गेल्या होत्या. त्या काळी विजेचे दिवे नव्हते. गणपत कंदिल घेऊन गावी निघाला. गावाची वाट जंगलातून जाणारी होती. सभोवताली किर्र काळोख पसरला होता. त्यामुळे वातावरण जास्तच भीषण झाले होते. रस्ता निर्मनुष्य. इतक्यात एक झाडाची फांदी पडली. गणपत घाबरला आणि एका झाडावर आदळला. त्यामुळे कंदिल पडला आणि फुटला. घाबरत गणपत उठला. त्याला चालण्याची चाहूल लागली. गणपतला वाटले भूतच आहे. त्यामुळे



तो किंचाळला. किंचाळलेला आवाज ऐकून चालणारा माणूस पुढे आला पण तो पांगळा होता. त्याच्या कुबड्यांचा तो आवाज होता, ते काही भूत नव्हते. त्या पांगळ्याने गणपतला विचारले, एवढ्या अंधारात कुठे निघालात? गणपतला हा आवाज एका माणसाचा आहे हे कळले आणि तो एकदम शांत झाला. त्याची भीतीच पळाली. तो निर्भय झाला आणि त्याने पांगळ्याचा हात हातात घेतला आणि चालू लागला. परमेश्वराच्या रूपाने तो पांगळा गणपतला भेटला. कारण त्याचा पांगळेपणा गणपतला जाणवलाच नाही. उलट त्याचा भरभक्कम अंधारच वाटला. म्हणून परमेश्वर सतत सांगाती असतो ही भावना मनात रुजवली की कायम त्याची साथ मिळेल आणि आपण निर्भय बनू.कथा उपदेश : निर्भय बनवून परिस्थीचा सामना करा.


## मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**
१. राष्ट्रभाषेत शपथ
४. विक्रमवीर सचिनचे आडनाव
८. शिव! शिव!
१२. मर्यादा
१३. रम्य, सुंदर स्थान
१४. राज्यकारभाराचे प्रमुख शहर
१६. आंध्रच्या किनार्‍यालगतचे बंदर
१८. उष्ण
१९. मला
२१. वेळ हिंदीत
२३. उघडणे
२५. गावातील टवाळ
२६. दात
२७. कबूतर
३०. वडिलांचा भाऊ
३१. रागाचे मोजमाप!
३२. ओलसर हवा
३४. वाळवी
३७. कायद्याप्रमाणे
३८. पैंजण
३९. ज्ञानेश्वर रचित प्रार्थना
४१. नाजूक
४३. गाडीचे पाय
४४. लागू पडल्यास नेमके औषध वा शब्द
४५. जाड दोर
४६. भूमीचे मार्दव सांगणारी कोंभाची हालचाल
४७. खोलवर नसलेले, वरपांगी
५०. एक अप्सरा
५१. आपमतलबी मंडळी हा देऊन कोहळा काढतात
५२. वसवलेली वस्ती
५५. उदा.हिरा, पाचू इ. प्रकार
५६. वजन, बोजा
५७. सूर्याचे एक नाव
५८. उगीच
६०. नगर, गाव
६२. पवित्र
६३. कौसल्यापुत्र
६५. मार्गस्थ
६६. घरातील मोठी माणसे
६८. पूर्वसूचना न देता
७१. 'कशाला उगाच' असा त्रास
७४. तापापूर्वी येणारे शहारे
७७. युवक
७८. या अभिनेत्रीने 'श्यामची आई' अजरामर केली
७९. जादा कामाचा दिवस!

**उभे शब्द**
१. खबदाड
२. सरळ लांब वासा
३. छेड काढणारा
५. बसल्याजागी लागलेली निद्रा
६. पांढुरका रंग
७. दारूचा एक प्रकार
८. दुर्लक्ष, हेळसांड
९. निच, विश्वासघातकी
१०. मातीचा कण
११. मालक
१५. पळणे
१६. अंजन
१७. आडमुठा, हट्टी
१९. चौथा हिस्सा
२०. वाटाण्याच्या ओल्या शेंगा
२१. शासनसंस्था, मंत्रीमंडळ
२२. माज
२४. भांडणात मध्यस्थी करणारा
२५. गवई
२७. तेच ते पुन्हा पुन्हा
२८. उणीव, कसर
२९. चिंतन
३०. मार्जारहत्या घडल्यास ही यात्रा करावी असा शास्त्रार्थ आहे
३१. बाळाचा मुका
३३. मऊशार हरळीसारखे कापड
३५. मिळमिळीत
३६. पृथ्वी
३७. शंकराचे एक नाव
४०. व्यवस्थापन
४१. कोमल, नाजूक, अपक्व
४२. चटकन
४३. एक पालेभाजी
४६. सीतेची जुळी मुले
४७. वाहन नेणे
४८. रममाण, निमग्न
४९. मांडणी
५३. मुलांचा एक बैठा खेळ
५४. घटस्फोट
५६. हमाल
५८. उलट, विरुद्ध
५९. फणसाचा एक प्रकार
६१. शंकर, प्रत्येक
६३. पौर्णिमा
६४. गळ्याभोवतीचे उबदार वस्त्र
६६. पहिला ऋतू
६७. रामबंधु
६९. कोवळी फांदी
७०. डुक्कर
७२. राबता, सवय
७३. दुबळा, गरीब
७५. पावसाची झड ७६. पडसे

## श्रीसिद्धान्तशिखामणी -अमृतधारा



### करणार्पितस्थल

संसारविषकान्तारसमुच्छेदकुठारिका ।
उपशान्तिर्भवेत् पुंसामिन्द्रियाणां वशीकृतौ।।४४।।

भावार्थ : इंद्रियांना वश करून अधीन ठेवल्याने मनुष्याच्या मनाला शांती लाभते. संसाररूपी विषवृक्षाला तोडून टाकणारी कुर्‍हाड म्हणजे मन:शांती होय.।।४४।।



# सैनिकी विद्यालयात एनसीसी कॅडेट्स तर्फे वृक्षारोपण संपन्न

उदगीर / प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात भारत सरकारच्या एक पेड माँ के नाम या उपक्रमांतर्गत एनसीसी कॅडेट्स तर्फे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी प्रमुख मान्यवर म्हणून प्राचार्य वसंत कुलकर्णी,पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के, मैनोद्दीन सय्यद, एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड, विज्ञान विषयाचे विभाग प्रमुख विलास शिंदे हे उपस्थित होते.

यासर्व मान्यवरांच्या उपस्थितीत एनसीसी कॅडेट्स तर्फे सैनिकी विद्यालयाच्या परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड यांनी वृक्षाचे महत्त्व सांगताना म्हटले, वृक्षांचे संवर्धन व संगोपन करणे गरजेचे आहे. वृक्षांमध्ये आपल्याला शुद्ध हवा, पाणी, सावली, फळे, औषधी व इतर वस्तू मिळतात. परिसराचे नंदनवन करावयाचे असेल तर वृक्षारोपण करावे. प्राचार्य वसंत कुलकर्णी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले, एनसीसी कॅडेट्स यांनी फक्त वृक्षारोपण करुन बसायचे नाही तर याच्या वाढीची जबाबदारी घेतली पाहिजे. या वृक्षांना वेळच्या वेळी पाणी, खत देऊन त्याची वाढ कशी होईल, याकडे लक्ष दिले पाहिजे. पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांनी वृक्षारोपण कार्यक्रमासाठी उपस्थित सर्वांचे आभार मानले. वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी गुरु वगवाड, नागेश पंगू, सुनील महिंद्रकर यांनी सहकार्य केले.

# महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात डॉ.व्ही.पी.राव सेंटर फॉर कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश चे उद्घाटन संपन्न

उदगीर / प्रतिनिधी- येथील महाराष्ट्र उदयगिरी महाविद्यालयात इंग्रजी विभागाच्या वतीने डॉ.व्ही. पी.राव सेंटर फॉर कम्युनिकेशन स्किल्स इन इंग्लिश चे उद्घाटन संपन्न झाले. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळावे त्याचबरोबर इंग्रजी भाषा अतिशय अस्सलिखित बोलता यावी यासाठी ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना या केंद्राचाउपयोग होणार आहे.

यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य, प्रमुख पाहुणे, त्याबरोबरच संस्था सदस्य यांनी सर्व विद्यार्थ्यांना आवाहन केले की या भाषा प्रयोगशाळेचा उपयोग करून सर्वांनी फायदा करून घ्यावा व इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवावे. या उद्घाटन सोहळ्याचे अध्यक्ष स्थानी संस्थेच्या उपाध्यक्ष डॉ. रेखा रेड्डी ह्या होत्या. मुख्य अतिथी आयआयटी मुंबई येथील वरिष्ठ भाषा प्रशिक्षक आणि महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी प्रा. बब्रुवान कोरे, तसेच श्रीमती सुलोचना कुमारी राव, श्री.संतोषकुमार,



श्री.विनोदकुमार आणि त्यांच्या परिवाराने आपली उपस्थिती नोंदवली.

या प्रसंगी सहसचिव डॉ.आर.एन. लखोटिया तसेच महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटीचे सदस्य प्रशांत पेन्सलवार, श्रीमती ललिता पाटील, प्राचार्य डॉ.आर.के.मस्के, उपप्राचार्य डॉ.एस.जी.पाटील, इंग्रजी विभागातील प्रा.एस.आर.नागोरी, प्रा.डॉ. एस.एम.सूर्यवंशी, प्रा.आर.एम.मुदुडगे, प्रा.डॉ.के. आर.गव्हाणे, प्रा.पी.व्ही. अंबेसंगे, प्रा.विलास काकनाळे, प्रा.अरविंद बिरादार, प्रा.शेख शादुल, प्रा.बालाजीप्रसाद घाळे, इंग्रजी विभागातील माजी प्राध्यापक, माजी विद्यार्थी तसेच सर्व भाषा विषयाचे प्राध्यापक विभागातील सध्याचे विद्यार्थी महाविद्यालयातील शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी यांची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.रोडगे शिवनंदा आणि प्रा.गारठे विजया लक्ष्मीयांनी केले तर आभार प्रा.डॉ. एस.एम.सूर्यवंशी यांनी मानले.

# एलओसी वर आले पाकिस्तानी सैन्याचे ४० लोक, सीमेवर करत होते गडबड, भारतीय जवानांनी केली फायरिंग

नवी दिल्ली,- जम्मू-काश्मीरमधील नियंत्रण रेषेजवळ म्हणजेच एलओसीजवळ पाकिस्तान रेंजर्सचा नापाक कट भारतीय लष्कराने हाणून पाडला. बदिपोरा जिल्ह्यातील गुरेझ सेक्टरमधील नियंत्रण रेषेजवळ नौशहरानादमध्ये सुमारे ३० ते ४० पाकिस्तानी सैनिक उपस्थित असल्याचे लष्कराच्या जवानांना आढळून आले. सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, त्यांच्यासोबत संशयास्पद वस्तू दिसून आल्यात, त्यामुळे तिथं बंकर बनवण्याची तयारी सुरू होती. पाकिस्तानी लष्कर हे बांधकाम करत होतं.

प्रकरणाचे गांभीर्य पाहून भारतीय लष्कराने तात्काळ पाक लष्कराला इशारा दिला. लाल झेंडा दाखवून पाक लष्कराला सतर्क करण्यात आले. यानंतर हलक्या शस्त्राने दोन राऊंड गोळीबारही करण्यात आला. त्यानंतर तेथील बांधकाम थांबवण्यात आलं आणि सैनिक परतलं. या घटनेत कोणीही जखमी झाल्याचे वृत्त नाही.

जम्मू-काश्मीरमध्ये सुरक्षा दलांची कारवाई सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी लष्कर एलओसीवर फायदा घेण्यासाठी हे बंकर बनवत होतं. हिवाळा येण्यापूर्वी भारतीय सीमेवरून जम्मू-काश्मीरमध्ये जास्तीत जास्त दहशतवाद्यांची घुसखोरी करण्याची पाकिस्तानची जुनी सवय आहे. लष्कर शक्य तितकी गस्त घालून अशा कारवायांना आळा घालण्याचा प्रयत्न करते. अलीकडेच कुपवाडा येथे लष्कराने दोन वेगवेगळ्या कारवाईत तीन दहशतवाद्यांचा खात्मा केला होता. २८ ऑगस्ट रोजी घुसखोरीचा प्रयत्न झाला होता. जम्मू-काश्मीरमधील मच्छल आणि तंगधर सेक्टरमध्ये नियंत्रण रेषेजवळ भारतीय लष्कराने या चकमकी केल्या होत्या. लष्कराने गुरुवारी सांगितले की, ''२८ ऑगस्ट रोजी गुप्तचर संस्थांकडून विश्वसनीय माहिती प्राप्त झाली, ज्याची जम्मू आणि काश्मीर पोलिसांनीही पुष्टी केली. त्यानंतर या भागात गस्त वाढवण्यात आली.

## वारसा प्रमाणपत्राचा जाहिरनामा

**मा.एन.जे.चव्हाण, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, उदगीर यांचे न्यायालयासमोर**

दिवाणी किरकोळ अर्ज क्र. ६७९/२०२४ नि.क्र. ७

ज्यापेक्षा नामे १) रुद्रप्पा पि. प्रभुअप्पा बारोळे हे दिनांक ०३.०९.२०२३ रोजी रा. कमालनगर ता.कमालनगर जि.बिदर येथे मयत झाले आहेत. २) संगप्पा शिवलिंगप्पा बारोळे हे दिनांक ०४.०५.२०१८ रोजी रा. तोंडार ता.उदगीर जि.लातूर येथे मयत झाले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १ मंगलबाई भ्र रुद्रप्पा बारोळे | वय ६८ वर्षे | धंदा - घरकाम |
| २ सुरेश पि. रुद्रप्पा बारोळे | वय ४७ वर्षे | धदा - नौकरी |
| ३. प्रदिप पि. रुद्रप्पा बारोळे | वय ४० वर्षे | धंदा - पेन्शनर |
| ४. अमोल पि रुद्रप्पा बारोळे | वय ३५ वर्षे | धंदा - शेती |
| ५ शरद पि रुद्रप्पा बारोळे | वय २९ वर्षे | धंदा- शेती |
| ६ नागनाथ पि. संगप्पा बारोळे | वय ६४ वर्षे | धंदा - शेती |
| ७ वैजनाथ संगप्पा बारोळे | वय ६८ वर्षे | धंदा |
| ८ विजयकुमार पि संगप्पा बारोळे | वय ५२ वर्षे | धंदा - शेती |

सर्व रा. तोंडार ता. उदगीर जि. लातूर

यांनी खालील नमुद हे मयताचे वारसदार असून

| अ.क्र. वारसाचे नावे | वय | मयताशी नाते |
|---|---|---|
| १ मंगलबाई भ्र रुद्रप्पा बारोळे | ६८ | पत्नी |
| २ सुरेश पि. रुद्रप्पा बारोळे | ४७ | मुलगा |
| ३. प्रदिप पि. रुद्रप्पा बारोळे | ४० | मुलगा |
| ४. अमोल पि रुद्रप्पा बारोळे | ३५ | मुलगा |
| ५ शरद पि रुद्रप्पा बारोळे | २९ | मुलगा |
| ६ नागनाथ पि. संगप्पा बारोळे | ६४ | चुलत भाऊ |
| ७ वैजनाथ संगप्पा बारोळे | ६८ | चुलत भाऊ |
| ८ विजयकुमार पि संगप्पा बारोळे | ५२ | चुलत भाऊ |

अर्जदार यांना १) रुद्रप्पा पि. प्रभुअप्पा बारोळ २) संगप्पा शिवलिंगप्पा बारोळे या नावाने त्यांना मयताचे वारसाचे प्रमाणपत्र शासकीय व निमशासकीय कामासाठी लागणार असल्यामुळे या न्यायालयात अर्ज केलेला आहे.

त्याअर्थी सदरहू वारसदार मयताचे जवळचे वारस नाहीत असे कोणास समजविण्याचे असेल तर त्यांनी या जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्या, आणि ह्या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्याचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू १) रुद्रप्पा पि. प्रभुअप्पा बारोळ २) संगप्पा शिवलिंगप्पा बारोळे याचे मयताचे वारसाचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २८/०८/२०२४ रोजी माझे सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

प्रकरणाची पुढील तारीख १०/१०/२०२४

डी.ए.कांबळे
कनिष्ठ लिपीक
३ रे सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

एम.एल.सुतराळे
सहाय्यक अधिक्षक
सह दिवाणी न्यायालय क.स्तर, उदगीर

पान १ वरून

### पंतप्रधानांनी ३....

आगमनामुळे लोकांमध्ये त्यांचा व्यवसाय, रोजगार आणि स्वप्ने पूर्ण करण्याचा आत्मविश्वास निर्माण झाला आहे, असे त्यांनी सांगितले.

आज देशभरात १०२ वंदे भारत रेल्वे सेवा सुरू आहेत आणि आतापर्यंत ३ कोटींपेक्षा जास्त लोकांनी या ट्रेनमधून प्रवास केला आहे, अशी माहिती त्यांनी दिली. हे आकडे केवळ वंदे भारत ट्रेनच्या यशाचे उदाहरण नसून भारताच्या आकांक्षा आणि स्वप्नांचे प्रतीक आहेत, असे ते म्हणाले.

आधुनिक रेल्वे पायाभूत सुविधा हा विकसित भारताच्या दूरदृष्टीचा मजबूत आधारस्तंभ असल्याचे पंतप्रधानांनी अधोरेखित केले. या क्षेत्रात जलद गतीने होणाऱ्या प्रगतीची रूपरेषा विशद करताना पंतप्रधानांनी रेल्वे मार्गांचे दुहेरीकरण आणि विद्युतीकरण, नवीन गाड्या चालवणे आणि नवीन मार्गांचे बांधकाम यांचा उल्लेख केला. यंदाच्या अर्थसंकल्पात रेल्वेसाठी २.५ लाख कोटी रूपयांपेक्षा जास्त निधीची तरतूद करण्यात आली असून, सरकारची पूर्वीची प्रतिमा बदलण्यासाठी सरकार भारतीय रेल्वेला उच्च तंत्रज्ञान सेवांशी जोडत असल्याची माहिती त्यांनी दिली.

विस्तार योजनांबाबत बोलताना पंतप्रधान म्हणाले की, वंदे भारतसोबत अमृत भारत ट्रेनचाही विस्तार केला जात आहे. ते पुढे म्हणाले की, वंदे भारतच्या स्लीपर आवृत्तीला लवकरच हिरवा झेंडा दाखवला जाणार आहे. लोकांच्या सुविधेसाठी नमो भारत ट्रेन चालवल्या जात आहेत आणि शहरांमधील वाहतूक समस्या सोडवण्यासाठी लवकरच वंदे मेट्रोजही सुरू करण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली.

### टि.सी.हरवली आहे

माझी गायकवाड मनिषा शत्रुघ्न या नावाची ९ वी (नवी )पासची मुळ टि. सी. १६/०८/२०२४ रोजी तळवेश गल्ली येथे हरवली आहे .कोणास सापडल्यास खाली मोबाईल नंबरवर संपर्क साधावा.

संपर्क:-८३९०५४६६३०

### आरक्षणास तयार...

सांगितले, तर त्याक्षणी राजीनामा पण देईन आणि राजकारणातून निवृत्तही होईन. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनीही सांगितले की, त्यांच्या संपूर्ण कार्याला माझे समर्थन आहे.

खरे म्हणजे मराठा समाजासाठी जे माझ्या कार्यकाळात झाले आहे. अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळ आम्ही तयार केले. एक लाख मराठा समाजाचे तरुण आज उद्योजक झाले. सारथी तयार केले, शेकडो तरुण यूपीएससीमध्ये आयएएस, आयपीएस झाले. एमपीएससीमध्ये वेगवेगळ्या पदावर निवडले गेले. डॉक्टरेट मिळाली. सगळ्या योजना मी सुरू केल्या आणि त्यांचे बळकटीकरण शिंदेंनी केले. अनेक नवीन योजना शिंदेंनी सुरू केल्या. तरी देखील देवेंद्र फडणवीसांचे मी आमदार पाडेन अशी नाराजी फडणवीसांनी व्यक्त केली.

मी नालायक आहे ना, मग या तिघांकडून त्यांनी घेऊन दाखवावे. या तिघांना त्यांनी म्हणावे की, आता तुम्हाला आमची मदत पाहिजे किंवा मदत केली आहे. तुम्ही आम्हाला हे लिहून द्या की, आम्ही मराठा समाजाला ओबीसीमध्ये आरक्षण द्यायला तयार आहोत असे देवेंद्र फडणवीस मनोज जरांगेंना म्हणाले आहेत.

### पुरी पिक्चर...

बालकल्याण मंत्री अदिती तटकरेंसह इतर महायुतीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थित हा कार्यक्रम होतो आहे. या कार्यक्रमात नागपूरसह विदर्भातून हजारोंच्या संख्येने महिलांची मोठी गर्दी उसळल्याचे बघायला मिळाले आहे.

महायुतीच्या वतीने आयोजित लाडकी बहिण योजनेच्या दुसऱ्या टप्प्याच्या कार्यक्रम उसळलेल्या गर्दीवरुन एकनाथ शिंदेंनी लाडक्या बहीणींचे आभार मानत भाष्य केलं. विमानतळावरून येताना खूप ट्रॅफिक होते, महिलांची मोठी गर्दी उसळली होती. मला इथे पोहोचायला माझ्या बहिणींमुळेच उशीर झाला असल्याचेही ते म्हणाले. पहिल्या टप्प्यात १ कोटी ७ लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा केले आहेत. आज ५२ लाख महिलांच्या खात्यात पैसे जमा केले असून उर्वरित महिलांच्या खात्यातही लवकरच पैसे जमा होतील.

नारी शक्ती इतिहास बदलती है

आज विरोधकांच्या पोटात दुखत आहे, यांची नियत समजून घ्या.. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रम सुरु आहे. महिला विकसित झाल्याशिवाय भारत पुढे जाणार नाही. तोट्यात असलेली एसटी महिलांना ५० टक्के सवलत देताच फायद्यात आली. मुलींना फी भरायला पैसे नाहीत असे सांगू नका, आम्ही फी भरू, बिजली चमकती है, नारी शक्ती गरजती है, तो इतिहास बदलती है, असे फडणवीस म्हणाले.

नोव्हेंबरमध्ये महायुतीला आशिर्वाद द्या

लाडकी बहीण योजनेची विरोधकांनी चेष्टा केली. टिंगल टवाळी केली. तुम्हाला कुणी अडवलं होते. तुम्ही का नाही आणली योजना. ही योजना पुढे चालू ठेवायची असेल तर नोव्हेंबरला महाराष्ट्रात निवडणुका आहेत, महायुती म्हणून कमळ, धनुष्य, घडयाळ घेऊन आम्ही उभे राहणार आहोत. तुम्ही आशिर्वाद द्या. पुढे पाच वर्ष ही योजना व्यवस्थित चालविली जाईल. कुणी माईचा लाल येऊ देत ही योजना बंद पडू देणार नाही, असा दावा उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केला.

### लाडकी बहीण...

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी आणि इतर महायुतीतील प्रमुख नेत्यांच्या उपस्थित हा कार्यक्रम होतो आहे. या कार्यक्रमात महिला आणि बालकल्याण मंत्री अदिती तटकरे या देखील उपस्थित आहे. या कार्यक्रमात नागपूरसह विदर्भातून हजारोंच्या संख्येने महिला या उपस्थित असून पेंडोल मध्ये बसायला जागा देखील शिल्लक नसल्याचे बघायला मिळत आहे. त्यामुळे शेजारचे सुरेश भट सभागृहात ही महिलांच्या बसण्याची व्यवस्था करावी लागली आहे.

### भारताला...

जवानमर्दीने २३६.८ पॉइंट्ससह सुवर्णपदक जिंकले, तर तुर्कीची इसेल ओझगनने २३१.१ पॉइंट्ससह रौप्य पदक जिंकले.

### महिलांच्या सन्मानासाठी...

आवाहनही जिल्हाधिकारी यांनी यावेळी केले.

महिला आणि मुलींच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात येत असून यासाठी दामिनी पथके, साध्या वेशातील पोलीस यांची शहरात गस्त सुरु आहे. महिलांशी गैरकृत्य झाल्याची घटना निदर्शनास आल्यास स्वतः संबंधित महिलेने किंवा इतर कोणत्याही व्यक्तींनी पोलिसांना माहिती द्यावी. त्याबाबतीत तातडीने आवश्यक कार्यवाही केली जाईल. मनात कोणतीही भीती बाळगता महिलांनी अशा घटनांची तक्रार पोलिसांना द्यावी. अशा महिलांची नावे गोपनीय ठेवण्याची खबरदारी घेतली जाईल. वेळीच अशा घटना रोखल्या तर गंभीर प्रकार टाळता येतात. त्यामुळे गैरकृत्यांची तक्रार त्वरित करावी, असे आवाहन जिल्हा पोलीस अधीक्षक सोमय मुंडे यांनी केले. तसेच महिलांच्या सुरक्षिततेसाठी अतिशय कठोर कायदे असून त्याबाबत महिलांनी जागरूक राहावे, असे ते म्हणाले.

निवासी शाळा, वसतिगृहे, आरोग्य संस्था अशा विविध ठिकाणी महिला, मुलींच्या सुरक्षिततेसाठी संबंधित आस्थापनाधारकांनी सीसीटीव्ही लावणे आणि ते सतत कार्यरत राहतील, याची खबरदारी घेणे बंधनकारक आहे. याबाबत केंद्र शासनाने आणि राज्य शासनाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे, असे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांनी सांगितले.

### वानवडा, शिंदाळा...

असा प्रश्न उपस्थित करून ठिकठिकाणी ग्रामस्थांशी संवाद साधताना भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, केंद्र आणि राज्य शासनाच्या योजना, जनतेच्या शंका, अडचणी, प्रश्न जाणून घेण्यासाठी मी आपल्या गावात स्वतः आलो आहे. लाडकी बहीण योजनेचे पैसे कोणा कोणाला मिळाले, वयोश्री योजनेचे अर्ज किती दाखल झाले, लाडका भाऊ योजनेचा लाभ मिळाला का, विहीर, गाय - गोठे किती शेतकऱ्यांना मिळाले, सोयाबीनचे अनुदान खात्यावर जमा झाले का, घरकुल किती जणांना मिळाले यासह विविध केंद्र आणि राज्य शासनाच्या योजनेचा लाभ कुणाकुणाला मिळाला असा प्रश्न उपस्थित करून संवाद साधला आणि ग्रामस्थांशी चर्चा केली. विविध योजनेचा लाभ मिळाल्याने उपस्थित नागरिकातून समाधानाचे वातावरण दिसून येत होते. लाडकी बहीण योजनेचा लाभ मिळाल्याने अनेक ठिकाणी महिलांनी आ. कराड यांना राखी बांधून सत्कार करून आभार व्यक्त केले.

ठिकठिकाणी ग्रामस्थांनी गावच्या विकासाच्या अनेक समस्या आमदार साहेबांसमोर मांडल्या. वानवडा येथील ग्रामस्थांनी मांडलेल्या प्रश्नावर औसा गटविकास अधिकारी यांना फोन करून गाय गोठे आणि विहिरीचे प्रस्ताव तातडीने मंजूर करावेत अशा सूचना आ. रमेशआप्पा कराड यांनी फोन करून दिल्या. तिन्ही गावात वीज पुरवठ्याच्या तक्रारी मांडल्या असता संबंधित अधिकाऱ्यांना फोनवरून सुरळीत विजपुरवठा करण्याच्या सूचना दिल्या. मनोहर तांडा येथे सेवालाल महाराज यांचे सभागृह बांधून देणार, येल्लोरी ते शिंदाळा रस्त्याचे काम करून देण्याची माझी जबाबदारी आहे असेही आ. रमेशआप्पा कराड यांनी बोलून दाखवले.

सत्तर वर्षात काँग्रेसला जे जमले नाही ते मोदी सरकारने दहा वर्षात करून दाखवले. राज्यातील महायुती शासनाने अनेक जनहिताच्या योजना सुरू केल्या या सर्व योजनांचा लाभ घेताना आम्ही कधीच जात धर्म असा भेद केला नाही मात्र काँग्रेसने ज्या काही योजना दिल्यात त्या तोंड बघून दिल्या. महायुती शासनाने सुरू केलेल्या लाडकी बहीण योजनेच्या माध्यमातून प्रत्येक महिलांना दरमहा दीड हजार रुपयाची मदत केली आहे. ज्या भावाने आधार दिला त्या भावाला निश्चितपणे बहिणीने आशीर्वाद द्यावा असे सांगून गोरगरीब जनतेच्या कल्याणकारी योजना कायम सुरू ठेवण्यासाठी येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत महायुतीला साथ द्यावी असेही आव्हान भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

या कार्यक्रमास वानवडा येथे फुलचंद अंधारे, चंद्रहार काळे, अशोक वीर, सुधाकर सोमवंशी, राजेंद्र घोडके, सरपंच मंगल अंधारे, चेअरमन संतोषी वीर, शंकर तळेकर, कमलाकर सोमवंशी, हिराकांत तळेकर, हिराकांत तळेकर, परशुराम मिरकले, दत्ता सोमवंशी, लिंबराज सोमवंशी, ज्ञानेश्वर होनमाळी, शिंदाळा येथे माजी सरपंच बाबासाहेब घोडके, तंटामुक्तीचे अध्यक्ष शिवाजी मुळे, उपसरपंच उमाकांत मुळे, शिवराज पाटील, राजकुमार घोडके, राजेंद्र राठोड, सुरज भोसले, महादेव घोडके, येल्लोरी येथे धोंडीराम लखादिवे, सरपंच संगमेश्वर येरटे, नागनाथ रिंगणकर, विजय बिराजदार, अविनाश येरटे, सोमनाथ बिराजदार, औठेश्वर महाराज, नितीन रिंगणकर यांच्यासह त्या त्या गावातील महिला पुरुष तरुण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

उदगीर मनोरंजन
कल्पना 70MM A/C DOLBY
११:३०,२:३०,०५:३०,८:३०
दररोज ४ शो







उदयगिरी लॉयन्स धर्मादाय नेत्र रुग्णालय, उदगीर
उदय कॉलनीच्या पाठीमागे, लॉयन्स नगर, नांदेड नाका, उदगीर-४१३५१७ जि.लातूर
फोन नं. ०२३८५-२५५२४५,२९५२४५ मो. ९७१०२५५२४५

| वेळ सकाळी ०९ ते ५ | सर्व प्रकारची नेत्र सुविधा उपलब्ध | रविवार ९ ते १ | @24 hrs X 365 |
|---|---|---|---|

| १,५५,००० मोतिबिंदू शस्त्रक्रिया | ४५०० नेत्रतपासणी व मोतिबिंदू शस्त्रक्रिया |
|---|---|

मराठवाड्यात एक अद्यावत नेत्र रुग्णालय
भेट देणारे विषेतज्ञ डॉक्टर्स

| | | |
|---|---|---|
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. नविन कुमार राठोड (हैद्राबाद) (M.D.,V.R.F.) LVPEI | ३ रा रविवार |
| मेडीकल व सर्जिकल रेटीना | डॉ. विडेकर चेतन किशारे (नांदेड) (D.N.B.,V.R.F.) LVPEI | २ रा शनिवार |
| कॉर्नीया सर्जन | डॉ. ए.आर. नळगीरकर (औरंगाबाद) (M.S.) (Cornea) | २ रा शनिवार |
| नासुर तज्ञ | डॉ. सचिन चोले (M.S.) (Cornea) (बीड) डॉ. व्यंकटेश पोलावार (DORL) (उस्मानाबाद) | २ रा रविवार ४ था रविवार |
| काचबिंदू व बालरोग तज्ञ चिकित्सा | डॉ. श्री/सौ. शितल उदय नाईक | ४ था रविवार |

!! अंधमुलांसाठी अरुणा अभय ओसवाल रिसोर्स सेंटर !!
अंधत्व मुक्त अभियानांतर्गत सहभाग नोंदवा

डॉ. सौ. अर्चना पवार (M.S.) फेको तज्ञ
डॉ.अंकिता लाहोटी (DOMS)
डॉ. दिपाली पाटील (MS)
डॉ. शितल पेद्देवाड (M.S.)
डॉ. अपुर्वा लखोटे (MS, Ayur)

डॉ. आर.एन.लखोटिया अध्यक्ष
व समस्त लॉयन्स परिवार, उदगीर
लॉ. प्रदिप बेद्रे सचिव



लोकमान्य अर्बन क्रेडीट को-ऑप. सोसायटी लि. उदगीर
नगरपरिषद, उदगीर जि. लातूर संस्थेच्या विविध ठेवी योजना

| कालावधी | व्याजदर |
|---|---|
| ३० ते ४५ दिवस- | ५.५०% |
| ४६ ते १८० दिवस | ७.५०% |
| १८१ ते ३६५ दिवस | ८.५०% |
| १२ महिने ते २४ महिने | ९.७५ % |
| २४ महिने ते ३६ महिने | १०.५०% |
| ३६ महिने ते ६० महिने | ११% |
| लोकमान्य मासीक व्याज प्राप्ती ठेव योजना | १०% |

**९% आवर्त ठेव द.सा.द.शे,** ०.५०% अधिक व्याजदर जेष्ठ नागरीक व महिला, दाम दुप्पट, ७८ महिने, वैयक्तिक कर्ज व इतर कर्ज १६%, सोने तारण कर्ज १४%, वेअर हाऊस कर्ज १६%, वरिल सर्व ठेवींवर नियम व अटी लागू.




# यशवंत

रविवार दि. १ सप्टेंबर २०२४

पान ८

# उदगीर

कार्यालय :०२३८५-२५३११८ मो.९८५०२२८२४०

email - yashudgirram@gmail.com


बालाजी अर्बन को-ऑप, क्रेडीट सोसायटी लि.

शिवाजी चौक मोंढा रोड, मार्केट यार्ड, उदगीर, पिन ४१३५१७

| कालावधी | व्याजदर | जेष्ठ नागरिक व महिलांसाठी व्याजदर |
|---|---|---|
| ३१ दिवस ते ४५ दिवस | ६.००% | ६.५०% |
| ४६ दिवस ते १८० दिवस | ७.००% | ७.५०% |
| १८१ दिवस ते ३६५ दिवस | ८.००% | ८.५०% |
| १ वर्ष १ महिना ते २ वर्ष | ९.००% | ९.५०% |
| २ वर्ष १ महिना ते ३ वर्ष | ९.२५% | ९.७५% |
| ३ वर्षापुढील मुदतीकरीता | १०.००% | १०.५०% |

मासिक प्राप्ती योजना :- आज रुपये १,००,०००/- भरा आणि दर महिन्याला रु.८०६/- मिळवा, मुदती नंतर रु.१,००,०००/- परत मिळवा. (सदरील योजना ३० महिने मुदतीकरिता उपलब्ध.) (९.७५%)
दाम दुप्पट योजना :- रुपये १,००,०००/- भरा आणि ८३ महिन्यामध्ये मिळावा रुपये २,००,०००/- (१०.१४%)

**उपलब्ध सुविधा**
वेअरहाउस लोन, गोल्ड लोन, कर्ज प्रक्रिया, जलद सेवा, एसएमएस बँकींग, मोबाईल बँकींग

# गणेश उत्सवात डिजेवर संपुर्ण बंदी

## सण उत्सव शांततेत व उत्साहात साजरे करावे :पोलिस अधिक्षक सोमय मुंडे

उदगीर (प्रतिनिधी) श्री गणेश मिरवणूकीत डिजे च्या आवाजामुळे अनेकांना आपला जीव गमवावा लागत आहे त्यामुळे गणेश उत्सवात डिजे वापराव बंदी घालण्यात आली असुन डिजे चा वापर करणार्या मंडळावर गुन्हे दाखल केले जातील पोलिस प्रशासनानी दिलेल्या सुचनांचे गणेश मंडळांनी पालन करावे असे आवाहन जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंडे यांनी केले.



गणेश उत्सव,पोळा व ईद ए मिलाम उत्सवानिमित्य उदगीर शहर पोलिस स्टेशन व ग्रामीण पोलिस ठाणे यांच्यावतीने शिवाजी महाविद्यालयाच्या सभागृहात शांतता समितीची बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

शांतता समिती बैठकीच्या अध्यक्ष स्थानी जिल्हा पोलिस अधिक्षक सोमय मुंडे हे होते प्रमुख उपस्थिती उपविभागीय अधिकारी सुशांत शिंदे, उपविभागीय पोलीस अधिकारी सोहेल शेख, तहसीलदार राम बोरगावकर, सार्वजनिक गणेश महामंडळाचे अध्यक्ष ॲड. गुलाब पटवारी,महावितरण चे कार्यकारी अभियंता सायस दराडे, गटविकास अधिकारी विवेक सूरडकर शहर पोलिस स्टेशनचे

पोलीस निरीक्षक अभिषेक शिंदे, ग्रामिण पोलिस ठाणेचे पोलिस निरीक्षक राजकुमार पुजारी, नायब तहसीलदार संदीप हाडगे, मुख्याधिकारी सुंदर बोंदर आदी उपस्थित होते.

प्रारंभी उपस्थितांचे स्वागत शहर पोलिस निरीक्षक अभिषेक शिंदे व राजकुमार पुजारी यांनी केले .यावेळी उपस्थित गणेश मंडळाच्या पदाधिकारी यांना मार्गदर्शन करताना सोमय मुंडे म्हणाले की, मिरवणूकीत डिजे वापरल्यामुळे नागरिकाच्या आरोग्यास धोका निर्माण होत आहे तर लेजर किरणामुळे डोळ्यावर परिणाम होतो .डिजे व लेजर किरणामुळे नागरिकांचे आरोग्यास धोक्या निर्माण होत आहे

सण उत्सव सर्वांचा आहे आपल्यामुळे दुसर्याला त्रास होणार नाही याची काळजी घ्यावी. गणेश उत्सव काळात डिजे वापरल्यास तात्काळ गुन्हे दाखल केले जाईल असा गर्भित ईशारा दिला. सण व उत्सवाच्या माध्यमातून सर्वसमाजाला एकत्र केले हा इतिहास विसरु नका सण उत्सव भक्तीभावाने साजरा करा पोलिस व प्रशासनाने दिलेल्या सुचनाचे पालन कराअसे आवाहन करुन उदगीर शहरात प्रशासन एकजूटीने काम करत आहे


हा सण उत्सव शांतत व उत्साहात पार पाडावेत

सुरुवाती पासुन विसर्जन पुर्ण होई पर्यंत बरोबर राहू

परवानगी देताना मिरवणूकीत कोणत्या ठिकाणी किती वेळ द्यायचा हे परवाणगी देतांनाच ठरवुन द्या असे सांगीतले.

न.प.चे मुख्याधिकारी सुंदर बोंदर म्हणाले की, मिरवणूक मार्गावरील सर्व खड्डे बुजवले जाणार असुन याबबतीत कोणतीच तक्रार राहणार नाही असे सांगून- गणेश मडळांनी सामाजिक उपकृम राबवावेत न.प.च्यावतीने अशा मंडळांने पारितोषक देऊन गौरवण्यात येईल असे सांगीन न.प.च्यावतीने अकरा हजार वृक्षाची रोपे गणेश मंडळांना देण्याचे जाहिर केले.

उपविभागिय अधिकारी सुशांत शिंदे म्हणाले की,गणेश उत्सव काळात प्रशासन सर्व सुविधा करेल निवडणूक मतदान विषक मतदान जनजागृती देखावे गणेश उत्सव काळात सादर करावेत ,वृक्षारोपणा उदगीर पॅटर्न करावा असे आवाहन केले. पोलिस निरिक्षक अभिषेक शिंदे यांनी गणेश मंडळांनी पारंपारिक वाद्याचा वापर करण्याचे आवाहन केले. उदयगिरी गणेश मंडळाचू कार्याध्यक्ष ॲड गुलाब पटवारी यांनी गणेश उत्सव शांततेत व उत्साहात पार पाडण्यासाठी गणेश मंडळांनी प्रशासनास सहकार्य करण्याचू आवाहन केले.प्रास्ताविक उपविभागिय अधिकारी सोहेल शेख यांनी केले संचलन प्रा.डॉ मल्लेश झुंगास्वामी यांनी तर आभार पोलिस निरिक्षक राजकुमार पुजारी यांनी मानले.या कार्यक्रमात सन२०२३-२०२४ गणेश उत्सवाचे पारितोषक पोलिस अधिक्षक सोमय मुंडू यांच्या हस्ते संपन्न झाले .यात नव युवक व्यापारी गणेश मंडळ पत्तेवार चौक प्रथम, श्रीमंत व्यापारी गणेश मंडळ ट्रष्ट कै.अशोकदादा पुदाले चौक व्दितीय,तरुण गणेश मंडळ-- शिवछत्रपती गणेश मंडळ प्रथम, राजस्थानी युवकागणेश मंडळ व्दितीय, भोई समाज गणेश मंडळ तृतिय,उत्तेजनार्थ-हावगी स्वामी युवक गणेश मंडळ ,ग्रामिण भागातील दावणगाव पिंपरी या गावच्या मंडळांना सन्मानित करण्यात आले.



# उदगीरमध्ये महिलांचा आनंद सोहळा

लातूर, दि. ३१ : महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविणे, त्यांना पुरेशा सोयीसुविधा उपलब्ध करून रोजगार निर्मितीसाठी चालना देणे, महिलांना स्वावलंबी, आत्मनिर्भर बनवणे, यासाठी विविध शासकीय योजनांची जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांचा लाभ मिळालेल्या महिलांचा आनंद सोहळा ४ सप्टेंबर रोजी उदगीर शहरातील महाराष्ट्र उदयगिरी हायस्कूलच्या मैदानावर आयोजित करण्यात आला आहे. या कार्यक्रमाची जय्यत तयारी प्रशासनाकडून सुरु आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचीही या कार्यक्रमाला उपस्थिती राहणार आहे.

यावेळी राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, पालकमंत्री गिरीश महाजन, क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे, महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या कार्यक्रमाच्या तयारीसाठी जिल्हा प्रशासनामार्फत विविध पथके स्थापन करण्यात आली आहेत. कार्यक्रमाला उपस्थित राहणाऱ्या महिलांसाठी आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी सूक्ष्म नियोजन करण्यात आले असून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अनमोल सागर यांच्याकडून याबाबत सातत्याने आढावा घेण्यात येत आहे. वाहतूक, बैठक व्यवस्थेसह सर्व आवश्यक बाबींकरिता नेमण्यात आलेल्या पथकांकडून पूर्वतयारी वेगाने सुरु आहे.

कार्यक्रमस्थळी विविध शासकीय विभागांच्या योजनांची माहिती देणारी दालने उभारण्यात येणार आहेत. यामुळे महिलांना शासनाच्या विविध योजनांची माहिती एकाच छताखाली मिळण्यास मदत होईल. मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना, मुलींना मोफत उच्च शिक्षण, मुख्यमंत्री अन्नपूर्णा योजना, महिला सन्मान योजना यासारख्या विविध योजनांमधून महिलांच्या स्वप्नांना बळ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी राज्य शासनामार्फत राबविण्यात येत असलेल्या योजनांचा लाभ जिल्ह्यातील सर्व पात्र महिलांना मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्न करीत आहे.

बुध्द विहार उद्घाटनालाही राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची उपस्थिती

उदगीर येथे उभारण्यात आलेल्या बुद्ध विहाराचे उद्घाटन ४ सप्टेंबर रोजी होत आहे. या कार्यक्रमालाही भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू उपस्थित राहणार आहेत. उदगीर शहरातील तळवेस येथे बुध्द विहाराचे बांधकाम करण्यात आले आहे. हे बुद्ध विहार कर्नाटकातील कलबुर्गी येथील बुध्द विहाराची प्रतिकृती आहे.

# उदगीर विधानसभा ची जागा ही भारतीय जनता पक्षाचीच :अमोल निडवदे

उदगीर / प्रतिनिधी- विधानसभा मतदारसंघामध्ये भारतीय जनता पक्षाचे प्राबल्य असून हा मतदारसंघ भारतीय जनता पक्षाचा गड मानला जातो त्यामुळे ही जागा २०२४ मध्ये सुद्धा भारतीय जनता पार्टीच लढविणार असल्याचे भारतीय जनता युवा मोर्चा लातूर जिल्हा अध्यक्ष श्री अमोल निडवदे यांनी सांगितले



१९९९ पासून ते २०१९ पर्यंत ५ विधानसभा निवडणुका झाल्या त्या निवडणुकांमध्ये ३ वेळेस भारतीय जनता पक्षाचे उमेदवार निवडून गेले आणि २ वेळेस भारतीय जनता पक्षाचा उमेदवार खूप कमी मतांनी पराभूत झाला असे चित्र आहे २००४ ला तर अतिशय ३००० सारख्या फरकाने निसटता पराभव भाजपचा झाला...या सगळ्या आकडेवारी वरून सिद्ध होते की उदगीर विधानसभा हा भाजपचा बालेकिल्ला आहे आणि ही जागा भारतीय जनता पक्षानेच लढवावी अशी सर्व युवा मोर्चा च्या कार्यकर्त्यांची इच्छा आहे...

उदगीर विधानसभेसाठी भाजप कडून अनेक जण इच्छुक आहेत त्यात प्रामुख्याने भाजपा ज्येष्ठ नेते पंडित सूर्यवंशी,प्रदेश सचिव बालाजी गवारे, ज्यांनी अल्पावधीत प्रचंड लोकप्रियता मिळविली असे युवा नेतृत्व श्री विश्र्वजित गायकवाड, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गायकवाड यांच्यासह युवा मोर्चाचे जिल्हा सचिव श्री साधूराम कांबळे, जिल्हा प्रसिध्दी प्रमुख श्री प्रसाद नाईकवाडे हे सुद्धा निवडणूक लढविण्यास इच्छुक आहेत... उदगीर विधानसभे मध्ये उदगीर आणि जळकोट तालुका मध्ये भारतीय जनता पक्ष वाढविन्यासाठी अनेक कार्यकर्त्याने योगदान दिले, वाडी तांड्या पर्यंत, तळागाळापर्यंत पक्ष नेला त्यांची ही मेहनत आम्ही वाया जाऊ देणार नाही, ही जागा भाजपच लढवेल असा विश्र्वास आहे.

# विद्यार्थी शाळेत रमले दप्तराविना लालबहादूर शास्त्री विद्यालयात आनंददायी शनिवार

उदगीर दि.३१ : येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात आनंददायी शनिवार ' विनादप्तर शाळा'हा आनंददायी उपक्रम घेण्यात आला. विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव मिळावा तसेच विद्यार्थ्यांना विना दप्तर शाळेत येण्याचा , आनंददायी वातावरणात आपल्या इच्छेनुसार काम करण्याचा अनुभव मिळावा हा उद्देश डोळ्यासमोर ठेवून शासन आदेशानुसार या कार्यक्रमाचे नियोजन विद्यालयात करण्यात आले. याप्रसंगी विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक किरण नेमट, माधव मठवाले यांची व्यासपीठावर उपस्थिती होती.

रोजच्या शाळेपेक्षा वेगळ्या दिवसाचा अनुभव विद्यार्थ्यांना मिळावा या उद्देशाने ' विनादप्तर शाळा ' या उपक्रमात अरुण



पत्की यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देऊन मार्गदर्शन केले. या उपक्रमात महावाचन, गणपती व बैल तयार करण्याची कार्यशाळा व कागद काम अशा तीन टप्प्यात विभागणी केली गेली.

महावाचन या भागात सर्व विद्यार्थ्यांना ग्रंथालयातील पुस्तके देऊन वाचन करण्यास सांगितले.यावेळी मुख्याध्यापक, उपमुख्याध्यापक ,सर्व पर्यवेक्षक,सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी महावाचनात सहभाग घेऊन पुस्तकाचे वाचन केले. गणपती व बैल तयार करण्याच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला. तसेच उत्तम पद्धतीने माती पासून गणपती व बैल तयार करण्याचे काम विद्यार्थ्यांनी उत्साहात पूर्ण केले.या विद्यार्थ्यांना विद्यालयातील सहशिक्षक गुरुदत्त महामुनी व संदीप पाटील यांचे मार्गदर्शन लाभले.कागद काम या भागातही विद्यार्थ्यांनी रंगीबेरंगी कागदापासून विविध वस्तू बनवण्याचे काम केले. आजच्या दिवसभराच्या कालावधीत विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद दिसत होता.प्रत्येक विद्यार्थ्याने मनापासून या कार्यक्रमात सहभाग घेतला.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अभ्यासपूरक मंडळ प्रमुख विजया गोविंदवाड यांनी तर प्रास्ताविक अनिता मूळखेडे यांनी केले. विद्यार्थ्यांना महावाचनात ग्रंथ उपलब्ध करून देण्याचे काम ग्रंथपाल अक्षय शिवशट्टे यांनी केले. तर विद्यार्थ्यांना काम विभागून देण्यासाठी निलेश मांडवकर यांनी प्रयत्न केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व शिक्षक,शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## सचिन काडवदे यांची गुणवंत अधिकारी म्हणून निवड

जळकोट : प्रतिनिधी- येथील पंचायत समितीचे कनिष्ठ प्रशासन अधिकारी सचिन काडवदे यांची महाराष्ट्र शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून संभाजीनगर विभागातील क्षेत्रीय स्तरावरील गुणवंत अधिकारी म्हणून निवड करण्यात आली आहे. वृक्षलागवड, कार्यालयीन स्वच्छता आदींसह अनेक उपक्रमांत त्यांनी सहभाग नोंदविलेला आहे.



या निवडीबद्दल गटविकास अधिकारी नरेंद्र मेडेवार, माजी सभापती बालाजी ताकबिडे, पाणीपुरवठा अभियंता वीरभद्र स्वामी, संभाजी केंद्रे, निखिल पांचाळ, शिवकांत पटवारी, नितीन मुक्कावाड, राहुल सुवर्णकार, शेख मैनोद्दिन, राजाराम अकुलवाड, लक्ष्मण ढोबळे यांच्यासह पंचायत समितीच्या सर्व सहाकाऱ्यांनी अभिनंदन केले आहे.

# मुलींनो पुस्तकांवर प्रेम करा पुस्तके तुमच्या जगण्याला बळ पुरवतील: सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे

उदगीर (प्रतिनिधी) आयुष्याला योग्य दिशा देण्यासाठी शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती करा व जीवनात प्रतिकूल परिस्थितीवर मात करत यशस्वी व्हायचे असेल तर पुस्तकांवर प्रेम करा पुस्तके तुम्हाला योग्य मार्गदर्शन करतील आयुष्यात जर काही बनायचे असेल तर मेहनतीशिवाय पर्याय नाही. वाटेत अनेक खाचखळगे लागतील पण त्यावरही तुम्हाला स्वतःच्या हिमतीवर निश्र्चितच मात करता येईल असे मत सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे यांनी मुलींना समुपदेशित करताना मांडले.

येथील लालबहादूर शास्त्री माध्यमिक विद्यालयात विशाखा समिती अंतर्गत किशोरवयीन मुलींच्या समुपदेशन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी विशेष अतिथी व



मार्गदर्शक म्हणून सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे उपस्थित होत्या. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या विशाखा समितीच्या अध्यक्ष मोहिनी आचोले तर विशेष उपस्थिती विद्यालयाचे मुख्याध्यापक अनंतराम कोपले, उपमुख्याध्यापक अरुण पत्की, पर्यवेक्षक कृष्णा मारावार, किरण नेमट यांची लाभली होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी विशाखा समितीच्या सचिव अनिता यलमटे यांनी विशाखा समितीच्या माध्यमातून वर्षभर राबवल्या जाणाऱ्या उपक्रमाची माहिती व समुपदेशनाची गरज प्रास्ताविकातून नमूद केली.

सोशल मीडियातून होणाऱ्या फसवणुकीबद्दल व गैरवापराबद्दल अनेक उदाहरणे सांगत मुलींनी नैतिक बळ ठेवावे असे आवाहन अध्यक्षीय समारोपात मोहिनी आचोले यांनी केले. सध्या समाजात सोशल मिडीयावरून गुन्हेगारीचे प्रमाण वाढत आहे. आपण मोबाईल व इतर सोशल मिडीयाचा गैरवापर न करता चांगली पुस्तके वाचा. वाम मार्गाला न जाता विशिष्ट ध्येयापर्यंत पोहोचावे असा संदेश त्यांनी मुलींना दिला .

यावेळी मुलींनी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे यांना अनेक प्रश्र्न विचारून मुलींच्या सुरक्षितते संदर्भात असणाऱ्या कायद्याची व सोयी सुविधांची माहिती जाणून घेतली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विशाखा समिती सदस्य लक्ष्मी चव्हाण तर आभार प्रदर्शन सुरेखा शिंदे , कल्याण मंत्र प्रीती शेंडे यांनी सादर केले . तसेचया कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विशाखा समिती सदस्य शोभा नेत्रगावकर अनिता मुळखेडे, प्रमोदिनी रेड्डी यांनी परिश्रम घेतले.



# सैनिकी विद्यालयात एनसीसी कॅडेट्स तर्फे स्वच्छता अभियान

उदगीर/ प्रतिनिधी- श्री छत्रपती शाहू महाराज सैनिकी विद्यालयात एनसीसी कॅडेट्स तर्फे स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

यावेळी विद्यालयातीचे प्राचार्य वसंत कुलकर्णी,पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के,एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड हे उपस्थित होते.

प्राचार्य वसंत कुलकर्णी यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हटले, एनसीसी कॅडेट्स यांनी स्वच्छता ही सेवा या माध्यमातून आपल्या परिसराची स्वच्छता केली पाहिजे.

एनसीसी प्रमुख बालाजी मुस्कावाड यांनी आपल्या मार्गदर्शनात म्हणाले , शासनामार्फत स्वच्छता अभियान राबविण्यात येते. परिसरात स्वच्छता असेल तर आपले आरोग्य चांगले राहते. उत्तम आरोग्य हीच खरी संपत्ती असते. त्यामुळे विद्यार्थ्यांनी आपले आरोग्य चांगले ठेवण्यासाठी आजुबाजुचा परिसर स्वच्छ ठेवले पाहिजे.

विद्यालयातील अमर जवान स्मारक, खेळाचे मैदान,वसतीगृह व शालेय इमारत या भागातील कचरा उचलून स्वच्छता मोहिम राबविली.

पर्यवेक्षक अरविंद सोनटक्के यांनी उपस्थित मान्यवर व विद्यार्थी यांचे आभार मानले.

## बुद्धिबळ स्पर्धेत दयानंद फार्मसीचे यश

लातूर : नांदेडच्या स्वारातीम विद्यापीठ व जयक्रांती कला महाविद्यालयाच्या वतीने घेण्यात आलेल्या विभागीय आंतरमहाविद्यालयीन बुद्धिबळ स्पर्धेत दयानंद इन्स्टिटयूट ऑफ फार्मसी महाविद्यालयाने अ विभागीय बुद्धिबळ स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकाविला. संघात अभिषेक आगलावे, शुभम बरड, प्रीत देशमाने, अमोल जाधव व गणेश पाटील यांचा समावेश होता. या खेळाडूंना क्रीडा शिक्षक सौरभ जांभळे यांचे मार्गदर्शन लाभले. यशस्वीतांचे कौतुक संस्थाध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, उपाध्यक्ष अरविंद सोनवणे, ललीतभाई शहा, रमेश राठी, सचिव रमेश बियाणी, संजय बोरा, प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. वाजीद चाऊस यांच्यासह पदाधिकाऱ्यांनी केले.